# माणूस

बुधवार
३ फेब्रुवारी १९७१
चाळीस पैसे



" ठीक आहे ! ठीक आहे ! ! तुम्ही म्हणता ती जागा मला मान्य आहे– बैठकीसाठी. जागांच्या वाटपाची चर्चा तेथे करू.... "

बुधवार ३ फेब्रुवारी १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : अठ्ठावन्नावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |
| किमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

□ आपण आपल्या दि. ६।१।७१ च्या अंकात 'विज्ञानेश्वरी' या सदरात श्री. दत्तप्रसाद दाभोळकर यांचा 'जेव्हा द्रौपदीला वस्त्रे-मिळतात' हा लेख प्रसिद्ध केलात ! प्रस्तुत लेखकाची 'वार' ओळखण्याची पद्धत पाहिली.
परंतु मी देत असलेली पद्धत वाचकांना अधिक सोपी वाटेल असे वाटते.

प्रथम प्रत्येक महिन्यासाठी दिलेले जादा आकडे लक्षात ठेवावे.

| | | | |
|---|---|---|---|
| जानेवारी – १ | एप्रिल – ० | जुलै – ० | ऑक्टोबर – १ |
| फेब्रुवारी – ४ | मे – २ | ऑगस्ट – ३ | नोव्हेंबर – ४ |
| मार्च – ४ | जून – ५ | सप्टेंबर – ६ | डिसेंबर – ६ |

लिपवर्षासाठी :– जानेवारी – ० व फेब्रुवारी – ३

प्रथम जन्मवर्षातील शेवटच्या दोन आकड्यांना चाराने भागून तो आकडा याच शेवटच्या दोन आकड्यात मिळवावा.

उदा० सन १९५२ म्हणून ५२ ÷ ४ = १३ + ५२ = ६५.

नंतर वरील बेरजेत तारीख व महिन्याचा जादा आकडा मिळवून आलेल्या संख्येस साताने भागावे. जी बाकी उरेल त्या क्रमांकाचा वार. (उदा. १ रविवार

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

२ सोमवार...) परंतु समजा बाकी शून्य उरली तर मात्र शनिवार धरावा.

उदा. २६ जानेवारी १९५२. म्हणून ६५ + ० + २६ = ९१ ( १९५२ हे लिपवर्ष आहे) ९१ ÷ ७ = १३ म्हणजे बाकी शून्य. म्हणून २६ जानेवारी १९५२ हा दिवस शनिवार आहे.

समजा जन्मवर्षातील शेवटच्या दोन आकड्यात चाराने पूर्ण भाग गेला नाही तर ज्या संख्येचा पूर्ण भाग जाईल ती संख्या मिळवावी.

उदा. १५ ऑक्टोबर १९२३.

२३ ÷ ४ = ५ (पूर्ण भाग)

२३ + १५ + १ = ४४ ÷ ७ = २ बाकी.

म्हणून सोमवार.

विसाव्या शतकातील कोणत्याही तारखेसाठी हे कोष्टक उपयोगी आहे.

जानेवारी, १९७१ — मुकुंद येवळेकर, पुणे

□ आजच 'पर्ल हार्बर' ह्या युद्ध इतिहासाचा शेवटचा लेखांक वाचून संपवला. खरोखरच श्री. विनय कुबेर ह्यांनी आठही लेख फारच आकर्षक रीतीने लिहिले आहेत.

मी व माझे ह्या प्रकल्पावरील मित्र आपल्या द्विसाप्ताहिकातील साहित्यावर बेहद्द खूष असतो. एक अंक वाचून झाला की दुसरा अंक कधी मिळेल ह्याची वाट पाहतो. मी स्वतः तर माणूस प्राक्षिक असल्यापासून त्याचा ग्राहक आहे व ते द्विसाप्ताहिक झाले तरी त्याच्यात येणाऱ्या साहित्याचा उच्च दर्जा कायम असल्याबद्दल आनंद वाटतो.

आपल्या द्विसाप्ताहिकात जवळ जवळ सर्वच विषयावर समतोल विचाराचे साहित्य येते. खेळावर मात्र फारच कमी माहिती येते. ती वाढविल्यास फारच बरे होईल. तसेच 'मराठवाड्याची हालहवाल' ह्या स्तंभातून फक्त नांदेड किंवा औरंगाबादच्याच बातम्या न देता पाचही जिल्ह्यातील व्यापक वर्तमान आल्यास ते वाचनीय होईल.

जानेवारी १९७१ — अ. रा. शिवणे, वसमतनगर

# हे गूढगुंजन की स्वप्नरंजन ?

'भगव्यावर विळाहातोडा' हा लेख आणि त्यावरचे शीर्षक ह्या दोन्ही गोष्टी आकर्षक असल्या तरी लेखकाने काही मूलभूत गोष्टी ध्यानात घेतल्या नाहीत असे दिसते. पहिली गोष्ट म्हणजे जनसंघाचा जन्म ! जनसंघ ही कट्टर हिंदुत्ववाद्यांनी भारतीय राजकारणाशी केलेली एक व्यवहारी तडजोड आहे ही गोष्ट सूर्यप्रकाशा-

इतकी सत्य आहे. चातुर्वर्ण्य मानणाऱ्या आणि मनुस्मृती पाळणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनसंघाशी असलेले पितृत्वाचे नाते, पितापुत्र दोघेही नाकारत असले-तरी अस्तित्वात आहे हे नक्की! आता प्रश्न पडतो तो जनसंघाचा जन्म कशा-साठी? भारतीय राजकारणात सनातनी आणि उदारमतवादी असे दोन स्पष्ट प्रवाह आहेत. जनसंघ त्यातल्या सनातनी प्रवाहाचे प्रतिनिधित्व करतो. प्रस्था-पितांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे ही एकमेव ऐतिहासिक भूमिका जनसंघाने आजपर्यंत पार पाडली आहे. ह्या भूमिकेलाच जनसंघीय राष्ट्रवाद म्हणतात. राष्ट्रीयीकरणाला सुप्रीम कोर्टापर्यंत जाण्याइतपत विरोध, संस्थानिकांच्या तनखे-बंदीला अत्यंतिक व कडवा प्रतिकार, शंकराचार्यांची पाद्यपूजा हे सारे ह्या 'राष्ट्र-वादी' भूमिकेचे पैलू आहेत. मार्क्सला सर्वार्थाने परकीय समजणारे आमचे जन-संघीय दोस्त हिटलरला मात्र स्वजन, आप्त, सखा समजतात ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. (राष्ट्रांच्या सीमा तुमच्यासाठी नाहीत हे सांगणारा जर्मन मार्क्स परकीय आणि 'इतर सारी राष्ट्रे जर्मनांसाठी आहेत' हे सांगणारा हिटलर, आर्यपुत्र, हा विनोद आहे खरा!) हिटलरने कम्युनिस्टांची भीती दाखवून, ज्यूंचा बागुलबोवा उभा करून सत्ता हस्तगत केली होती. जनसंघही त्याच मार्गाने जाऊ पहात आहे.

आता अशा ह्या 'भगव्या'वर विळा हातोडा उमटू शकेल काय? हा खरा प्रश्न आहे. हे अशक्य आहे. असा विळा हातोडा भगव्यावर बसलाच तर मग गुरुजींची संगत सोडावी लागेल, टाटा-बिर्लांना 'गुड बाय' करावा लागेल, गोमातेचा निरोप घ्यावा लागेल. थोडक्यात सांगायचे तर सर्व प्रस्थापित हितसंबंधांना आणि हितसंबंधीयांना जनसंघाला निरोप द्यावा लागेल. हे शक्य नाही. ज्याचा जन्मच मुळी प्रस्थापित हितसंबंधाच्या संरक्षणासाठी तो जनसंघ. प्रस्थापित हितसंबंधांना मूठमाती कशी देऊ शकेल? म्हणूनच 'भगव्यावर विळा हातोडा' हे विचार आकर्षक असले, मनोरंजक असले तरी त्यांना वास्तवाचे भान नाही! 'भगव्यावर विळा हातोडा' हा विषय स्वप्नरंजनाचा जरूर होऊ शकेल. पण सत्यस्थितीत त्यामुळे कुठलाच फरक पडणार नाही.

जानेवारी, १९७१ पंकज चव्हाण, कोल्हापूर

[ या विषयावरची चर्चा आता थांबवली आहे—सं. ]

गुजराथचे वार्तापत्र :

# वैताग : बुढ्ढ्या मंडळींचा सत्तालोभ

दादुमिया

हितेंद्रभाईंसमोर आज मुख्य प्रश्न आहे " कॅबिनेट रीशफल " किंवा मंत्रीमंडळाच्या पुनर्रचनेचा.

लोकशाहीचा हा मोठा दुर्गुण आहे. कोठे कोणाचा अहंकार दुखावला गेला की लगेच राजीनामा नाहीतर डीफेक्शन (पक्षांतर)! हुकूमशाहीत अहंकार पदोपदी दुखावला जायचाच हा जणू नियम असतो. त्यामुळे " पक्षांतर " वगैरे भानगडच नाही. नाहीतर कोर्टमार्शल !!

बडोद्याचे महाराज लोकसभेसाठी उभे आहेत. हे महाराज लोकांना वाटते त्यापेक्षा खूप बिलंदर असतात. हे निवडून आले की त्यांची असेंब्लीतील जागा खाली होणार! त्या जागेवर डोळा ठेवून असणारे एक खादीधारी इच्छुक वृत्तपत्रांतून आपल्या बाजूने आपला प्रचार करीत होते.

" समाज को बदल डालो " असे आता म्हणावे लागत नाही. समाज खूपच बदलेला आहे व रोज बदलतो आहे.

रामदासांच्या काळी " जो आपण आपुली करी स्तुति तो एकचि मूर्ख " हे खरे असेल. आजच्या लोकशाहीच्या जमान्यात " जो आपण आपुली न वाजवी टिमकी, तो एकचि मूर्ख " हे सत्य अनुभवावयास मिळते.

पण या खादीधारी इच्छुकास असा जबरदस्त तडाखा बसला आहे महाराजांच्या विधानाने—

महाराज मराठी. त्यामुळे गुर्जर प्रजेस ते विशेष मान्य नाहीत. प्रजा म्हणजे सुशिक्षित प्रजा हं! अजून बहुजनसमाजापर्यंत प्रांतीयवाद, संकुचित वृत्ती वगैरे रोग पोचलेले नाहीत.

वरील इच्छुकाने महाराजांना थोडी दमदाटी देण्याचा प्रयत्न केला होता. आपण

पडला तर अमुक होईल वगैरे बऱ्याच कटू गोष्टी त्यांनी महाराजांना सुनावल्या होत्या. लगेच या इच्छुकाच्या विरुद्ध पक्षीयाने (म्हणजे गटाने) महाराजांना खडसावले, "अहो, त्यांच्या नादी काय लागता ? त्यांच्या भाच्यास त्यांना तुमच्या जागी उभे करायचे आहे. त्यांच्याजवळ दोन चार कोटी रुपये काळा पैसा जमला आहे. त्याची मस्ती आहे ही !"

महाराजांची झोप या परस्परविरोधी मतांनी उडाली काय ?

छे:, त्यांचेही सल्लागार असतातच !

महाराजांनी नवीन बूट काढला, माझ्या रिकाम्या झालेल्या जागेवर माझा बंधू पाठविला जावा !

आली का पंचाईत ?

थोडक्यात, वरून खालपर्यंत साऱ्यांना आपल्या गोतावळ्याचा रोग लागू झाला आहे.

मोतीलाल, त्यांचे सुपुत्र नेहरू, त्यांची कन्या इंदिरा, त्यांचा चिरंजीव संजीव—

जगजीवनरामांचा सुपुत्रही अशाच पद्धतीने तिकीट मिळवितो—

आणि बेटा कांती 'देसाई' घराण्यात——

हितुभाई शांत डोक्याचे आहेत म्हणून बरे आहेत. नाही तर प्रत्येक मिनिटाला त्यांचे ब्लड प्रेशर वाढले असते.

कारण दर आठवड्यास कोणी तरी मंत्री पक्षांतर इंडिकेटमध्ये करतो किंवा 'तसे करेन' म्हणून धमकी देतो.

निवडणूक होईस्तोवर ही पक्षांतरांची लटकती तलवार हितुभाईंच्या डोक्यास अशीच भेडसावीत राहणार—

सध्या मंत्र्यांना ज्या नव्या जबाबदाऱ्या वाटून देण्यात आल्या आहेत त्या सर्व 'ॲड हॉक' पद्धतीने. पण त्यातून तर सारा गोंधळ निर्माण झाला आहे.

बहुधा सर्व विभाग, सर्व धर्म व सर्व सामाजिक स्थर यांना प्रतिनिधीत्व द्यावे असा अलिखित नियम आहे. सहसा सत्ताधीश याचा भंग करीत नाहीत. पण सध्या गुजरायेत 'विभागीय असमता' झाली आहे.

बाबूभाई पटेल आधीपासूनच अर्थमंत्री तर आहेच. पण त्या जोडीला पब्लीक वर्क्स, पॉवर व सिव्हील सप्लाय हीसुद्धा खाती त्यांना हितुभाईंनी दिली आहेत.

खरी मळमळ शासकीय व्यवस्थेविरुद्ध नाही. त्या खात्यातील एक जरी खाते आपल्यापैकी कोणाला मिळाले तर किती कमावण्यास मिळेल ? ही ती जळजळ असते.

आणि 'हे खाते तुम्हाला देऊ जरा धीर धरा,—' असे गाजर डोळ्यासमोर टांगून ठेवून मोरारजी व हितुभाई किती तरी घोड्यांना आपल्या पक्षाच्या बाजूने दौडवीत आहे—

आदिवासी आज मागासलेले राहिलेले नाहीत. त्यांच्यातील पुढाऱ्यांतही आज मंत्री बनण्याची जबरदस्त ईर्षा आहे. सौराष्ट्रात असंतोष का आहे माहीत आहे? सारे मंत्री गुजरातचे आहेत म्हणून.

पूर्वी जीवराज मेहता सौराष्ट्रीयन मुख्यमंत्री होते. तेव्हा शासन चांगले होते असे यांचे म्हणणे. (कदाचित् मुख्यमंत्री आज सौराष्ट्राचा नेमला गेला तर हे आजचे शासन श्रेष्ठ ठरण्याचा संभव आहे!) जनसंघाकडे व इंडिकेटकडे हे असंतुष्ट लोक गुजराथेत सर्वप्रथम न वळले तर नवल नाही.

मोरारजी देसाई व जीवराज मेहता यांचे हाडवैर तर सर्वश्रुतच आहे. जीवराज मेहताही या राजकीय स्पर्धेत सामील आहेत. प्रश्न आहे, त्यांना मोरारजीस बुढ्ढा व सत्ताप्रेमी म्हणण्याचा काय नैतिक अधिकार पोचतो? जीवराज मेहता काय लहान आहेत?

जनतेस वैताग आला आहे तो या बुढ्ढ्या मंडळींच्या सत्तालोभाचा.

तरुण मंडळी सरळ सरळ दोन गोष्टी उघड बोलतात. पहिली गोष्ट हुकुमशहा हवा आहे ही. आणि दुसरी या सत्तालोभी म्हाताऱ्या मंडळींना दूर करावयास पाहिजे ही. महाराष्ट्रातील तरुण वाचकांना गुर्जर तरुणांतील हा बदल झाल्याचे वाचून नवल वाटेल. पण ही गोष्ट सत्य आहे. राजकारणातील stagnancy आता दूर झाली पाहिजे हा साऱ्या तरुण वर्गाचा सूर आहे.

तरुणांचे हे नवीन मानसशास्त्र कोणीही भारतीय पुढारी अभ्यासीत नाही याचा मला संताप येतो.

तरुणतरुणींना एवढाही भाव द्यायची यांना एवढी भीती का वाटावी? कदाचित् स्वतःच्या खुर्चीपलीकडे त्यांना काहीही दिसू शकत नाही. सत्तेने त्यांचे डोळे आंधळे झाले असले पाहिजेत. पूर्वीचे राजे वेश बदलून प्रजेत हिंडत. तीही हिंमत यांच्यात नाही. त्यांना तरुणांची भीती वाटते.

मला आठवते, मोरारजीभाईंना माझ्याबरोबर पायी फिरायला येणार असाल तर दारूचा प्रत्येक अनधिकृत् अड्डा दाखवीन, असे आव्हान दिले होते! मोरारजी नुसते हसले. या बुढ्ढ्या मंडळींना ही आमची सारी मस्करी वाटते का?

अरेरे, यांना तरुण पिढीची एवढीही पर्वा नसेल तर तरुण पिढीही यांचा भविष्यात मान राखील असे वाटत नाही. ह्या बुढ्ढ्या मंडळींचे स्वागत चप्पल-बूट आदी पवित्र वस्तूंनी होईल असे मला वाटते. (चप्पल व पुढारी यात फरक एकच. चप्पल नवीन असली तर चावते. पुढारी जुना झाला की चावू लागतो. दोघांना काही काळानंतर फेकूनच द्यावे लागते!)

रोटरी, लायन व ज्युनियर चेंबर्स या संस्था काहीतरी चळवळी करीत असतात. त्यात तरुणांना फायदा व्हावा अशी इच्छा असते का? बिलकूल नाही. तेथे खूप

पृष्ठ ५४ वर

## माझा जाहीरनामा

**डॉ. स. द. पुणेकर**

प्राध्यापक
टाटा समाजशास्त्र संस्था, मुंबई



# सर्वसाधारण मतदार गोंधळून गेला आहे....

सध्याच्या लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तयार केलेला जाहीरनामा, हा मुख्यत: केंद्रीय वा राष्ट्रीय पातळीवर असणे साहजिक आहे. म्हणजे त्यात महत्वाच्या राष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा येणे स्वाभाविक ठरते. परंतु त्याचबरोबर राज्य आणि स्थानिक पातळींवरील विशेष प्रश्न डावलून चालत नाही. कारण यातील बहुतेक प्रश्न राष्ट्रीय प्रश्नांशी निगडित असतात. म्हणजे एकंदरीत जाहीरनाम्याने राष्ट्रीय, राज्य व स्थानिक या तीन्ही पातळींवरील, नागरिकांना महत्वाच्या वाटणाऱ्या प्रश्नांची, चर्चा करून त्यावरील आपली निर्णायक मते दिली पाहिजेत.

हे विविध प्रश्न पुन्हा निरनिराळ्या क्षेत्रातील असू शकतील. त्यातील तीन क्षेत्रे विशेष महत्वाची आहेत – आर्थिक, सामाजिक आणि राजकीय. ही क्षेत्रे अर्थातच परस्परपूरक आहेत पण चर्चेच्या सोयीकरिता ती अलगपणे विचारात घेता येतील. प्रत्येक पातळीवरील प्रश्नांची या तीन क्षेत्रात विभागणी केल्यास, एकंदर नऊ विभागात जाहीरनामा मांडणे शक्य होईल.

विभागवर जाहीरनामा आखण्यापूर्वी पार्श्वभूमी म्हणून स्वातंत्र्योत्तर पाव-शतकाच्या कालखंडामध्ये घडलेल्या (आणि घडविलेल्या) प्रमुख घटनांचे सिंहाव-लोकन करणे इष्ट ठरेल. त्याचबरोबर सत्तारूढ पक्षाच्या अडचणी आणि मर्यादा

स्पष्ट करणे भाग आहे. जाहीरनामा म्हणजे सध्याची परिस्थिती सुधारण्याबद्दल दिलेले आश्वासन. ते देण्यापूर्वी आतापर्यंत परिस्थिती का व कशी विघडत गेली, काय चुका झाल्या, त्या कुठपर्यंत व कशा टाळता आल्या असत्या, इत्यादी बाबींचे प्रामाणिकपणे, इतिहासाच्या पार्श्वभूमीवर विवेचन झाले पाहिजे. मगच आपणाला नजिकच्या भविष्यात काय करता येणे शक्य आहे, ते सांगता येईल.

चौदा-पंधरा ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री भारताचा स्वातंत्र्यसूर्य उगवला. दीड शतकभर चाललेल्या अविरत स्वातंत्र्यसमरानंतर, कितीतरी देशभक्तांच्या बलिदानाने, भारताने हा आनंदाचा क्षण पाहिला. परंतु देशाची फाळणी, मानवी हत्याकांड आणि शरणार्थींची शोचनीय परिस्थिती यामुळे या आनंदाच्या क्षणाला दु:खाने ग्रासले गेले. त्यावेळी मी दिल्ली-सिमल्याच्या परिसरात असल्याने, हे आनंद-दु:ख मिश्रित वातावरण प्रत्यक्ष पाहिले व अनुभविले. उज्वल भविष्यकालाच्या अपेक्षेने, लोकांनी आपली वैयक्तिक दु:खे मागे सारली. राजकीय स्वातंत्र्य ही जनतेच्या दृष्टीने एक अनोखी, आनंदकारक व आशावादी घटना होती. परंतु त्या स्वातंत्र्याच्या प्रखर प्रकाशात आम्हाला आमचा मागासलेपणा विविध स्वरूपात व स्पष्टपणे दिसू लागला. भयानक दारिद्र्य, अत्यंत निकृष्ट जीवनराहणी, नैसर्गिक साधनांचा अपुरा उपयोग, बेकारी व अर्धबेकारी, वाहतूक व दळणवळणांच्या साधनांचा अभाव, आर्थिक व सामाजिक विषमता, ग्रामीण व नागरी वातावरणातील भिन्नता, निरक्षरता, तंत्रज्ञांचा अभाव, रोगराई, अपमृत्यु, वैद्यकीय सोयींचा अपुरेपणा, घरटंचाई, जातीय द्वेष, परस्परातील हेवेदावे – एक ना दोन नाना भीषण संकटे समोर दिसू लागली. आतापर्यंत अशा अनिष्ट संकटांचे खापर आम्ही ब्रिटिश राज्यकर्त्यांवर फोडून मोकळे होत असू. परंतु आता राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर त्या स्वातंत्र्याचा उपयोग करून, सर्वसाधारण जनतेला आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य मिळवून देण्याची जबाबदारी आपल्यावर, म्हणजे पर्यायाने आपल्या नेत्यांवर येऊन पडली.

ही जबाबदारी आपल्या नेत्यांनी कितपत पार पाडली ? याचे उत्तर बहुतांशी निराशाजनकच द्यावे लागेल. स्वातंत्र्यानंतर लगेच, राष्ट्रपित्याचा खून झाला व थोड्याच काळात उत्तम प्रशासनाबद्दल गाजलेल्या सरदार पटेलांना मृत्यु आला. पंडित नेहरूंच्या हातात एक तपाच्यावर अनियंत्रित सत्ता आली पण आज इतिहासाचा कौल हाच रहातो की या सत्तेचा त्यांनी दुरुपयोग केला. कुठलेच महत्वाचे प्रश्न त्यांनी निर्णायक रीतीने सोडविले नाहीत. समाजवादी समाजरचनेचे ध्येय पुढे ठेवून, आर्थिक व सामाजिक समतेचे आश्वासन देऊन त्यांनी दीर्घकाळ जनतेला झुलविले. घटना व योजना समिती ही लोकांना फसविण्याची आणखी दोन साधने. चीनने केलेल्या १९६२ च्या आक्रमणाने, आमच्या आंतरराष्ट्रीय राजनीतीचे पण अवमूल्यन झाले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी पंडित नेहरूंनी जी अभिमानास्पद काम-

गिरी बजावली, तीवर त्यांच्या स्वातंत्र्योत्तर दोषास्पद कार्यरीतीने काळोखी फासली. एक उत्कृष्ट स्वातंत्र्ययोद्धा निकृष्ट प्रशासक ठरला. देशाला त्याने झपाट्याने अवनतीच्या मार्गाला नेले.

लाल बहाद्दूर शास्त्रींनी आपल्या अल्प कारकिर्दीत पाकिस्तानच्या आक्रमणाला यशस्वी तोंड देऊन देशाची प्रतिमा काही काळ उजळ केली. परंतु काळाने डाव साधला. त्यानंतरचा सध्याचा धरसोडीच्या राजकारणाचा काळ. पुन्हा भोंगळ समाजवादाची भुलावणी. आणि त्याकरिता बँकांचे राष्ट्रीयीकरण व संस्थानिकांची तनखाबंदी यासारखे उच्च न्यायालयाने अवैध ठरविलेले पण लोकांना आकृष्ट करण्याकरिता आचरलेले उपाय. आजच्या इतकी सामाजिक व नैतिक मूल्यांची अवनती पूर्वी कधीच झाली नसेल. जुगाराच्या (लॉटरीच्या) मार्गाने पैसा कमविण्यास राज्य सरकारला काहीच नैतिकदृष्टचा अनुचित वाटत नाही. काळाबाजार करणारे, करचुकवे, आणि असेच समाजशत्रू पक्षात आणि शासनात मानाने मिरवितात. प्रामाणिक विद्वानांना बाजूला सारून, वशिल्याचे लोक प्रत्येक क्षेत्रात पुढे घुसतात. 'सर्वे गुण: कांचनम् आश्रयन्ते' हे वचन आजच्याइतके कधीच सार्थ नव्हते. धनवान माणूस विद्वान, रसिक, विचारवंत, कलावंत इत्यादि विविध भूमिकात नेत्याच्या आविर्भावात वावरतो. निवडणुकींना भरमसाठ खर्च येत असल्याने त्याला सनदशीररीत्या पुढारी होणे सोपे जाते.

बहुधा सर्वच राजकीय पक्षांना अशा अनिष्ट रोगांची लागण झालेली असल्याने, सर्वसाधारण मतदार गोंधळून जातो. शिवाय त्याने पाच वर्षाकरिता निवडून दिलेला आमदार वा खासदार दिलेली आश्वासने पाळत तर नाहीच, परंतु वैयक्तिक स्वार्थाकरिता पक्षही बदलतो. मानवी, नैतिक वा सामाजिक मूल्यांची अशी अवहेलना होत असल्यामुळे कुणाला मत द्यावयाचे हेच मतदाराला कळत नाही. त्यांच्याकरिता हा जाहीरनामा.

सुरुवातीला सांगितलेल्या नऊ विभागात कुठल्या महत्वाच्या बाबी अंमलात आल्या पाहिजेत, त्यांची ही विभागवार यादी–

## १. राष्ट्रीय पातळी । आर्थिक विभाग

- देशाचे उत्पन्न वाढवून त्याचे न्याय्य विभाजन करणे.
- शेतीचे व औद्योगिक उत्पादन वाढणे, लहान शेतकऱ्यांना व छोटया उद्योगधंद्यांना उत्तेजन देणे, सहकारी उद्योग वाढविणे, इंडस्ट्रियल इस्टेट्स् अधिक कार्यक्षम करणे.
- परकीय आर्थिक मदतीवर कोठल्याही बाबतीत अवलंबून न राहता, स्वावलंबी बनणे.
- अधिक नोकऱ्या निर्माण करून बेकारी व अर्थबेकारीचे निर्मूलन करणे.

बेकारभत्ता देऊन बेकारांकडून वाजवी आणि वाजवी दरात काम करुन घेणे.

## २. राष्ट्रीय पातळी । सामाजिक विभाग

□ सामाजिक उन्नती हे ध्येय आणि आर्थिक प्रगती हे साधन मानून त्यानुसार योजना आखणे. उदाहरणार्थ राष्ट्रसंपत्ती वाढविणे हे साधन आणि त्यायोगे समाजाला प्रगतीपथावर नेणे हे साध्य. यामुळे पैसा मिळविणे हेच ध्येय राहणार नाही.

□ आर्थिक विषमता नष्ट करून, सामाजिक समता आणणे.

□ समान संधी...समान दर्जा ही तत्वे प्रत्यक्षात अंमलात आणणे. गुणवत्तेला प्राधान्य देऊन, वशिलेबाजी बंद करणे. याकरिता शक्यतोवर शिक्षण, आरोग्याच्या सोयी, कल्याणकारी कामे विनामूल्य तत्वावर झाली पाहिजेत. लोकांकडून त्यांच्या शक्तीप्रमाणे जमा (वा कर) वसूल करणे आणि त्यांच्या गरजांप्रमाणे खर्च करणे ( from each according to his ability & to each according to his needs.) याकरिता सामाजिक सुरक्षिततेचे विविध उपाय विस्तृत स्वरूपात अंमलात आणणे.

□ राष्ट्राचा सांस्कृतिक दर्जा उंचावेल असे उपाय योजणे. ललित कला अकादमीसारख्या संस्थावर योग्य नियंत्रण ठेवून त्या काही हितसंबंधी लोकांच्या खाजगी मालमत्ता होणार नाहीत यांची काळजी घेणे. कला, संगीत, नाट्य, लेखनादि विविध क्षेत्रात हुशार तरुणांना वर येण्याची संधी देणे. स्त्रिया, बालके व तरुण यांच्याकरिता कार्यक्रम आखणे.

## ३. राष्ट्रीय पातळी । राजकीय विभाग

□ लोकशाही समाजवाद प्रत्यक्षात अमलात आणणे. आज वैधानिक लोकशाही (parliamentary Democracy) अपूर्ण स्वरूपात आहे तेथे जनतेचा प्रभाव असलेली (Participating Democracy) अंमलात आणणे.

□ निवडणुकीच्या खर्चात कपात करणे आणि अवास्तव खर्च करणाऱ्या उमेदवाराला (तो निवडून आला तरीही) कडक शासन करणे. आज पुष्कळ मतदार पैशाच्या बळावर निवडून येतात. लोकसभेच्या निवडणुकीत उमेदवाराला लाख रुपयांच्या वर खर्च येतो. गांधीजींनी कल्पिलेली लोकशाही की ज्यात एखादी हरिजन स्त्री भारताची राष्ट्राध्यक्ष होऊ शकते, आज तरी अस्तित्वात नाही. ती लोकशाही अंमलात आणणे.

□ परराष्ट्र संबंधात पूर्णपणे स्वतंत्र व स्वाभिमानाने देशाला जगता आले पाहिजे. याकरिता कोठल्याही परकीय देशाची कशाही तऱ्हेची मदत नम्रपणे पण ठामपणे नाकारली पाहिजे. शिक्षण व समाजकल्याण यांच्या बुरख्याखाली राजकारण खेळणाऱ्या परकीय संस्थांना देशात थारा असता कामा नये. त्यांच्या देशातील दलालांना कडक शासन केले पाहिजे.

## ४. राज्य पातळी। आर्थिक विभाग

◻ राज्यातील विविध विभागांचा (कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा) आर्थिक व औद्योगिक विकास झाला पाहिजे. आज त्यात असलेले हितसंबंध व राजकारण नष्ट करणे जरूर आहे.

◻ महाराष्ट्र शेतीप्रधान होणे कठीण आहे. त्यामुळे उद्योगधंदे, व्यापार, शिक्षण इत्यादी क्षेत्रांतील प्रगतीवर भर देणे आवश्यक ठरते. त्याचप्रमाणे मच्छिमारी, जहाजबांधणी, खनिज संपत्तीवरही भर दिला पाहिजे. या विविध क्षेत्रात संशोधन व नंतर विकास यावर भर दिला पाहिजे.

◻ दळणवळण व वाहतुकीची साधने वाढविणे जरूर आहे. कोकण रेल्वे, सागरी वाहतूक आणि राज्यांतर्गत हवाई वाहतूक वाढविणे जरूरीचे आहे.

## ५. राज्य पातळी। सामाजिक विभाग

◻ शासनाच्या काही वर्षापूर्वीच्या इंग्लिश भाषाविषयक आत्मघातकी धोरणामुळे महाराष्ट्राची एक पिढी शैक्षणिकदृष्टया बरबाद झाली. ते नुकसान पूर्णपणे भरून काढून, महाराष्ट्राची एकेकाळी असलेली शिक्षणाची उच्च परंपरा पुन: प्रस्थापित करणे.

◻ आरोग्यविषयक सुखसोयी, गृहनिर्माण, कल्याणकारी कार्ये यात वाढ करणे.

◻ नाटच, संगीत, कला, लेखन याबाबतीत महाराष्ट्र सदैव आघाडीवरच राहिला आहे. सर्व क्षेत्रातील विविध स्तरांतील कलावंतांना पुढे येण्याला उत्तेजन देणे. इतर राज्यातील कलावंतांशी व त्यांच्या संस्थांशी विधायक संपर्क ठेवणे.

◻ लॉटरी, मटक्यासारख्या जुगारांना आळा घालणे आणि मद्यपानबंदी यशस्वीरीत्या अंमलात आणणे.

## ६. राज्य पातळी। राजकीय विभाग

◻ आज महाराष्ट्राचे राजकारण जातीयवाद व गटबाजीवर पोसलेले आहे, त्यातून त्याची सुटका करणे. निर्मळ लोकशाही अंमलात आणणे. आपले आपले हक्क आणि आपल्या जबाबदाऱ्या यांची जनतेला जाणीव करून देणे. लोकशाही समाजवादाची बीजे जनतेमध्ये रुजविणे.

◻ पंचायती राज्य चांगल्या तऱ्हेने चालविणे. तसे ते चालल्यानंतर पंचायतींना अधिक अधिकार देणे.

◻ आज सांस्कृतिक वा सामाजिक संस्थामधून परकीय देशांना पोषक (व काहीं अंशी भारताला मारक) असे राजकारण चालते ते थांबविणे.

◻ अल्पसंख्याकांचे संरक्षण करणे, पण त्याचबरोबर त्यांचे निष्कारण लाड न करणे.

### ७. स्थानिक पातळी । आर्थिक विभाग

□ महापालिकेचे उत्पन्न योग्य त्या मार्गांनी वाढविणे आणि त्याचा योग्य विनियोग करणे.

□ जनतेच्या कल्याणाचे उद्योग व सेवाविभाग महापालिकेने आपल्या ताब्यात घेणे व कार्यक्षमतेने चालविणे.

□ वीज व बसवाहतूक अधिक कार्यक्षम आणि उत्पन्नदायी करणे.

### ८. स्थानिक पातळी । सामाजिक विभाग

□ महापालिकेच्या क्षेत्रातील शिक्षण, आरोग्यादि विविध विभाग वाढवून अधिक कार्यक्षम करणे.

□ शहरातील सर्व जनतेच्या सुखसोयींकडे लक्ष पुरविणे.

□ मुंबई महानगर प्रादेशिक योजना मंडळाने नुकताच (१९७१) जो अहवाल राज्यसरकारला सादर केला आहे त्यातील मुंबई शहराबद्दलच्या सूचना अंमलात आणणे.

### ९. स्थानिक पातळी । राजकीय विभाग

□ महापालिकेच्या कामकाजात पक्षीय राजकारण न आणणे.

वरील जाहीरनामा जरी ढोबळ स्वरूपाचा असला तरी एकंदर कार्याची विस्तृत व्याप्ती ध्यानात येणे कठीण नाही. हे सर्व कार्य एकटयादुकटयाचे नाही. किंबहुना सर्वांच्या सहकार्याविना ते यशस्वीपणे पार पाडणे कठीण. तसेच कार्याच्या विविध अंगाची विस्तृत व स्पष्ट रूपरेखा आखणे जरूर आहे. ज्या पक्षांनी या स्वरूपाचे कार्य करण्याचे ठरविले आणि ज्यांच्याबद्दल अशा तऱ्हेचे कार्य होईल असे वाटते, त्याच पक्षांना मतांची याचना करण्याचा हक्क आहे. मतदारांनीदेखील जागृत राहून पक्ष आणि उमेदवार यांची या निकषावर निवड करणे जरूर आहे.

□ □ □

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

# हे कलकत्ता

## सौ. तारा पंडित

सावल्या !

निवडणुकांचं वारं सर्वदूर खेळू लागलं आहे. प्रत्येक प्रांतातला प्रत्येक माणूस-ज्याला राजकारणात विशेष रस नाही असा सामान्य माणूस देखील-विचार करू लागला आहे. बंगाल त्याला अपवाद नाही. उलट बंगालमधील निवडणुका कशा पार पडतील ह्या एक चिंतेचाच विषय आहे. त्यामुळे निरनिराळे लोक निरनिराळ्या दृष्टिकोनातून विचार करीत आहेत.

कुणाला वाटतं, बंगालमधील सध्याच्या परिस्थितीत निवडणुका शांतपणे व योग्य प्रकारे पार पडणे शक्य तरी आहे का ? ज्या ठिकाणी कायद्याची अंमल-बजावणी करणाऱ्या अधिकारी वर्गालाच सुरक्षिततेची गरज भासते तेथे सामान्य माणूस आपल्या मतदानाच्या अधिकाराचा कितपत निर्भयपणे उपयोग करू शकेल याची कल्पनाच करावी. ह्या मुदतपूर्व निवडणुका भारताचं भविष्य ठरविणार आहेत तेव्हा प्रत्येकाने कुणाच्याही प्रचाराला बळी न पडता अत्यंत जागरूक राहून मतदान करणे आवश्यक आहे. पण तशी शक्यता मात्र निर्माण व्हायला हवी.

कुणाला वाटतं-ज्या प्रांतात लोक स्वतःच्या सावलीला देखील भितात आणि कोनाकोपऱ्यात त्यांना सतत धोकेच दृष्टीला पडतात अशा ठिकाणी निवडणुका म्हणजे निव्वळ फार्सच नव्हे काय ?

कोणाच्या मते, पंतप्रधानांनी बंगालमध्ये निवडणुका घडवून आणणं हा शुद्ध वेडे-पणा आहे. आज कलकत्त्याची परिस्थिती अशी आहे की रात्र होताच लोक बाहेर पडण्यास कचरतात आणि निर्भयपणे मतदान करा असा पंतप्रधानांचा तर आदेश आहे. कदाचित मतदान केंद्रावर जाण्यापूर्वी लोक फिरून एकदा विचार तरी करतील किंवा मोठ्या संख्येने अनुपस्थित तरी राहतील.

कोणी म्हणतात ह्या निवडणुकातून काही विशेष निष्पन्न होईल-निदान बंगाल-मध्ये तरी-असं वाटत नाही. पुन्हा एखादे युनायटेड फ्रंट सत्ताधारी बनेल आणि सामान्य जनतेला काही भलं होण्याची आशा उरणारच नाही.

आज बंगालची आर्थिक परिस्थिती इतकी खालावलेली असताना निवडणुकांच्या-पायी कित्येक लाख रुपयांचा चुराडा होणार आणि सामान्य माणसाला मात्र हे उघड्या डोळ्यांनी बघावं लागणार !

मतदानाच्या वेळी सरकार सैन्याची मदत घेणार असे ऐकिवात आहे. खरं म्हणजे भारतीय सैन्य राजकारणापासून अगदी अलिप्त आहे. तेव्हा ह्यावेळीच सैन्याचा राजकारणात शिरकाव करून घेण्यात काय मंतलब ?

## Site for C. P. I.

तारीख चौदा जानेवारी. सकाळची वेळ. डायमंड हार्बर रस्त्याकडे जाताना ट्राम-मधून एक आगळं दृश्य दिसलं. दोनतीन ठिकाणी भिंती चुन्याने स्वच्छ रंगवून त्यावर Site for C. P. I. अशी अक्षरं कोपऱ्यात लिहिलेली आढळली. हे जागेचं रिझर्वेशन जणू अगोदरच करून ठेवलेलं असावं, दुसऱ्या पक्षांनी ह्या जागेवर आक्रमण करू नये म्हणून. आता लवकरच C. P. I. चे नारे त्या रिझर्व केलेल्या जागेवर झळकतील. भिंती अगोदर रिझर्व करण्याचा एवढा आततायीपणा का कर-ण्यात आला ते सहज लक्षात येण्याजोगं आहे. गेल्या आठवड्यात डमडमजवळ घडलेली हकीकत. दोन पक्षांचे लोक आपापले नारे लिहिण्याच्या उद्देशाने एका भितीच्या विशिष्ट भागाजवळ आले. दोन्हीकडच्या लोकांना तीच जागा हवी होती. मग बाचाबाची सुरू झाली आणि तिचं रुपांतर मारामारीत व्हायला वेळ लागला नाही. चांगलंच युद्ध जुंपलं.

......तीच पुनरावृत्ती होईल अशी C. P. I. च्या लोकांना भिती वाटली की काय ?

## हॉटेल, सिनेमा !

काही दिवसापूर्वी कलकत्ता कार्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनी येथील सिनेमागृहे व हॉटेलांचा ' सर्व्हे ' घेतला. तेव्हा असे आढळून आले की १३२ सिनेमागृहे व हॉटेलां-पैकी सुमारे ८०, आरोग्याला घातक अशा परिस्थितीत आहेत. पाण्याच्या टाक्यां-मध्ये घाण साचलेली आहे. ' फ्लश ' बरोबर चालत नाहीत. अग्निशामक साधनां-चाही अभाव आहे, इ. इ. अशा परिस्थितीत ह्या सिनेमा-हॉटेलांचे परवाने रद्द का होत नाहीत असा सर्वसाधारण माणसाचा सवाल आहे.

जे कार्पोरेशन असा ' सर्व्हे ' घेते तेच अशा आरोग्य बिघडविणाऱ्या सिनेमा-हॉटेलांचे परवाने नव्याने चालू करून देते (renew) ही आश्चर्याचीच गोष्ट होय.

□ □ □

# नुकतीच स्काउटची जांबोरी पार पडली ते तिथेही होते....

एक अनेकरंगी व्यक्ती

संथपणे वाहणारं ते कृष्णेचं निळं पाणी अन् तीरावर उभी असलेली ती उंच शिखराची मंदिरं, एवढंच त्या प्रतिमेत चित्रित केलं होतं. पण कितीतरी वेळ मी ते चित्र पाहात होतो. एखाद्या वेड्यासारखं पुनः पुन्हा पाहात होतो. त्यातील रंगांच्या मिश्रणाची अन् वलयदार रेषांची ती जादू माझ्या मनाला वेड लावून गेली होती. तसं होतं ते साध्या वॉटरकलरचंच पण मला मात्र वाटलं ते ऑईल-पेन्टचं. इतकी चकाकी, टवटवीतपणा अन् तजेला त्यात दिसून येत होता. त्याचं नाव होतं गणपतीघाट, आणि ते दुसरं 'कृष्णाकाठ'! कृष्णेच्या संथ निळ्या पाण्याचं अन् त्यावर डोकावणाऱ्या हिरव्यागार वृक्षांचं चित्रकाराचं वेड जसं त्यातून प्रतीत होत होतं, तसंच पाण्यात पडलेली प्रतिबिंब चितारण्याचं त्याचं कसबही त्यातून दिसून येत होतं. मी ती चित्रं एकामागून एक सारखा पाहात होतो. त्यातील रंगांची उधळण, विविध रंगछटांचा हळूवारपणे घडलेला आविष्कार, सुसंवादी रंगांनी साधलेला मेळ, हे सारं काही मोठं विलोभनीय होतं. मनाच्या संवेदनांना हेलकावे देणारं होतं. रंगाच्या या किमयेतूनच चित्रकारानं निसर्गातील हिरवीगार वृक्षराजी, संधिप्रकाश, आकाशाची विविध रंगरूपं, निळ्या पाण्याची झाक, सूर्याची कोवळी उन्हं अन् त्यामुळं जमिनीवर चित्रित झालेली लतावेलींच्या छायेची पखरण अशा कितीतरी दृश्यांचं मनोहारी दर्शन त्यातून घडविलं होतं. हे झालं निसर्गचित्रांचं, पण अशीच दुसरी आणखीही काही चित्रं होती. तीही पाहता-

चंद्रहास जोशी

घ्याला अशीच सुंदर, मधुर, कलापूर्ण अन् एका आगळयाच वातावरणात नेऊन सोडणारी ! एक साधं पिंपळपान पण त्यावरच रंगांच्या विविध मिश्रणानं अन् सुसंगत रेषांच्या कमानदार वळणानं कितीतरी विलोभनीय आकृत्या निर्माण केल्या होत्या. त्या आकृत्यांना जसा रेषांचा घाट होता, रंगांचा त्यात मेळ होता तसा त्याला विशिष्ट अर्थही होता. त्याच्या शीर्षकातच तो अर्थ प्रकट होत होता. त्यांची संख्या उणीपुरी शे-दीडशे असावी. त्या साऱ्यांचेच विविध आकार अन् शीर्षकं मनाला भुरळ पाडणारी असली, तरी त्यातही राधाकृष्ण, बुद्ध, ख्रिस्त, मेरी, मीरा, शांतिदूत, पुढारी, पनघट, प्रतिक्षा या चित्रातील वैशिष्टयपूर्ण आकृतीबंधांची जादू काही वेगळीच होती. कुणाही रसिकमनाची कळी सहज उमलावी इतके सौंदर्य, माधुर्य, गूढता अन् धुंद त्यात भरली होती.

या चित्रकाराची किमया एवढयावरच थांबली असं नाही, तर त्यानं एका रंगातून नाना तरंग जसे निर्माण केले तसे विविध कलातरंग स्वतःच्याही जीवनात त्यानं निर्माण केले होते. चित्रकलेच्या जोडीलाच त्यानं छायाचित्रातही आपलं कौशल्य दाखविलं होतं. मुंबईच्या अप्सरा टॉकीजवरील अर्धपुतळयाचं त्यानं काढलेलं छायाचित्र अन् एका व्यक्तीच्या चेहऱ्याचं एन्लार्जमेंट ही त्या कौशल्याची खरीखुरी प्रतीकं होती. एकात छायाप्रकाशाचा समतोल साधला होता, तर दुसऱ्यात मानवी चेहऱ्यावरील एकेका पेशीचा जिवंतपणा दृगोचर होत होता.

आम्हाला वाटलं झालं; निसर्गचित्रं झाली. पिंपळपानांवरील कलाकृत्या झाल्या अन् छायाचित्रणं ! म्हणून आटोपतं घेण्याच्या मार्गाला आम्ही लागलो, पण समुद्रातील बर्फाच्या तुकडयाचा केवळ एक चतुर्थांश भागच तेवढा वर दिसावा अन् तीन चतुर्थांश भाग पाण्यात असावा तसंच या कलावंतासंबंधीही झालं. चित्रातलं कसबं हे त्याच्या कलापूर्ण हाताचा एक आविष्कार होता खरा, पण त्याहीपेक्षा त्यानं आपलं खरं हस्तलाघव दाखविलं होतं ते कागदाची अन् लाकडाची फुलं, (वूडवर्क), लाकडावर केलेलं खोदकाम, धातूंच्या ओतीव अन् कलाकुसरीनं तयार केलेल्या मूर्ती, शाडूचे गणपती, गौरी, किल्ल्यावरील चित्रं, पितळेच्या ओतीव घंटा, घुंगरू, मूर्ती, अडकित्ते, कातरी अन् अशा कितीतरी वस्तू तयार करण्यात ! त्यांच्याच जोडीला त्यानं कातडी लहानशा वहाणा, चिंध्यांचा मोर, पडद्यावरील पॅचवर्कस, नानारंगी पिशव्या, घरच्याच टाकाऊ घागरीचा डग्गा, छत्रींच्या तारां पासून तयार केलेली शिंकी, कपडयाच्या रॅक्स, घडीची विळी, जादूची पेटी, आणि हे सर्व तयार करण्यासाठी लागणारे साचे, ऐरण आणि हातोडा, घमेलं, कुदळी, खोरी अन् खुरपी अशी सारी हत्यारं-साहित्यही स्वतःच तयार केलं होतं. त्याच ऐरण-होताडयाच्या साहय्यानं अतिशय लहान अंगठयांसाठी विविध प्रकारचे मोनोग्रॅमसही तयार केले होते. त्यात नाना झाडांच्या, नाना फुलांच्या, नाना

पृष्ठ ४९ वर

# मराठवाड्याची हालचाल

देवदत्त तुंगार

## मराठवाडा रिपब्लिकन स्टुडंटस् फेडरेशनचे पहिले अधिवेशन

मराठवाडा प्रदेश रिपब्लिकन स्टुडंटस् फेडरेशन ही पाच जिल्ह्यांतील दलित समाजाच्या विद्यार्थ्यांची प्रातिनिधिक संघटना असून तिचे प्रथम–महाधिवेशन नांदेड येथे १६ व १७ जानेवारीस यशस्वीरीत्या पार पडले. यशस्वीरीत्या शब्द-प्रयोग केवळ औपचारिकपणे येथे वापरला नाही. दलित व उपेक्षित समाजातील व्यक्तींच्या अधिवेशनात अस्मितेचे व असंतोषाचे जे दर्शन घडायला हवे होते ते सदर अधिवेशनात घडले. भारतीय (हिंदु) समाजातील स्वातंत्र्यवीर सावरकर, आचार्य विनोबा भावे, जनरल करिअप्पा इत्यादी महनीय व्यक्तींवर प्रा. या. वा. वडस्कर यांनी केलेली द्वेषमूलक व निराधार टीका लक्षात घेऊनही अधिवेशनातील एकंदर चर्चा चांगली झाली.

अधिवेशनात नांदेड जिल्ह्याबाहेरील सुमारे ८० प्रतिनिधी उपस्थित होते. उद्घाटनास समाजकल्याण मंत्री ना. भारस्कर येणार होते पण ते (मंत्र्याच्या नेहमीच्या कार्यबाहुल्यामुळे) येऊ शकले नाहीत. अर्थात् त्यांची अनुपस्थिती 'मरण स्वस्त होत आहे' फेम प्रसिद्ध कलाकार मुंबईचे श्री. बाबूराव बागूल यांच्यामुळे जाणवली नाही. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. गो. रा. म्हैसेकर यांनी अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजाचे प्रश्न मार्मिकपणे मांडले. प्रमुख पाहुणे न्यायाधीश श्री. बी. एस्. मोरे यांनी लोकशाहीच्या मूलतत्त्वाचे निरूपण राज्यघटनेच्या संदर्भात विशद केले.

अधिवेशनात एकूण ३० ठराव पास झाले. विद्यापीठाच्या विधीसभेवर दलित समाजातील विद्यार्थ्यांना प्रतिनिधित्व द्यावे, कारण 'स्पृश्य' विद्यार्थ्यांना दलितांच्या व्यथा व समस्या समजत नाहीत, कृषी विद्यापीठात प्रवेशासाठी घरी शेती असण्याची अट असते ती काढून टाकावी, कारण मागासलेल्या समाजातील व्यक्तींना शेतीसाठी

जमीनच नसते. ते भूमिहीन असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव महाराष्ट्रातील एखाद्या विद्यापीठास द्यावे, दलितावरील अन्याय दूर करण्यासाठी खास न्यायाधीश व खास पोलीस कमिशनर नेमावेत, महाराष्ट्र परिवहन आयोग व इतर तत्सम समित्यांवर दलितांना प्रतिनिधित्व द्यावे इत्यादी ठराव पास झाले. 'गांधी, अशोक आणि राष्ट्रघात' या श्री. हार्डीकर लिखित पुस्तकावर बंदी घालावी, उत्तर प्रदेशात भगवानदास संपादित डॉ. आंबेडकरांसंबंधीच्या पुस्तकावरील बंदी उठवावी, ज्ञानेश्वरीतील काही भाग, गीताई व रुक्मिणीहरण या पुस्तकातील भाग पाठ्यपुस्तकात समाविष्ट करू नये, अशीही मागणी ठरावात करण्यात आली आहे. मागील गांधीजयंतीच्यावेळी औरंगाबाद येथे गौतमबुद्धाचा पुतळा विद्रुप करण्यात आला, त्यावेळी बौद्ध विद्यार्थ्यांनी मिरवणूक काढली व निषेध नोंदविला. या प्रकरणात प्रोत्साहन व सक्रिय साहाय्य दिल्याच्या आरोपावरून सरकारने औरंगाबादच्या मिलींद कॉलेजचे प्राचार्य म. भि. चिटणीस, आंबेडकर कॉलेजचे प्राचार्य नाथ, सायन्स कॉलेजचे प्राचार्य शिंदे व श्री. चंद्रमोहन वाघ यांची नावे (Black-List) काळ्या यादीत घातली आहेत, ती नावे यादीतून काढून टाकावीत अशीही मागणी एका ठरावाद्वारे करण्यात आली आहे.

या अधिवेशनात धर्माबादच्या लाल बहादुर शास्त्री महाविद्यालयातील प्रा. पोहरे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. आंबेडकरप्रणित समाजवाद या विषयावर प्रा. गंगाधर पानतावणे (संपादक अस्मितादर्श, औरंगाबाद), प्रा. एन्. जी. भवरे, प्रा. वडस्कर व श्री. रावसाहेब कसबे आदींची भाषणे झाली.

## दलित साहित्यिकांची वाङ्मयीन चळवळ

मुंबईचे श्री. बाबूराव बागुल यांनी दलित साहित्यिकांच्या वाङ्मयीन चळवळीसंबंधी उद्बोधक विचार व्यक्त केले. लेखकाचे 'मन' संस्कृतीने, परंपरेने घडते. समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था यांचे प्रतिबिंब साहित्यात पडते. धार्मिक व सांस्कृतिक विचारांचा फार मोठा पगडा मराठीच्या आतापर्यंतच्या साहित्यावर पडलेला असून 'हिंदु–मन'च त्यात मुख्यतः प्रतिबिंबित झालेले आहे. मराठी साहित्याचे हे 'छोटेपण' आहे. धार्मिक बंधनांचा बोझा झुगारून देऊन मुक्त स्वातंत्र्याचा, जीवनातील वासनांचा आविष्कार झाला पाहिजे. विज्ञाननिष्ठेचा स्वीकार करायला पाहिजे, असे श्री. बागुल यांनी सांगितले. प्रा. वडस्कर यांच्या भाषणाचा विषय 'ब्राह्मण्यवाद बनाम समाजवाद' हा होता. विषयाच्या मथळ्यावरूनच 'प्रतिपाद्य वस्तू'ची कल्पना चाणाक्ष श्रोता करू शकतो. भाषणही झाले तसेच. शंकराचार्य, गोळवलकर गुरुजी, चातुर्वर्ण्य यांसंबंधी टीका होणे अपेक्षित होतेच. पण विनोबा, सावरकर, महर्षी कर्वे, करिअप्पा, सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारख्या नेत्यांवर व विचारवंतांवर प्रा. वडस्कर यांनी केलेली टीका द्वेषमूलक तर होतीच, पण सर्वस्वी अपुऱ्या माहितीवर व गैरसमजावर आधारीत होती. वडस्कर कम्युनिस्ट छापाचे पोथीवादी

प्राध्यापक आहेत हा समज त्यामुळे खरा ठरला. वडस्कर यांच्या एकांगी भाषणाचा अपवाद सोडता अधिवेशन चांगले झाले. सर्वश्री विजय सोमकुअर, कांबळे, पंडित आदी कार्यकर्त्यांनी अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी बरेच परिश्रम घेतले. दलित समाजातील प्राध्यापक श्री. नरेंद्र गायकवाड या माझ्या मित्राने 'पडद्याआड' राहून अधिवेशनाच्या श्रीगणेशापासून 'सूप' वाजेपर्यंत अविश्रांत मेहनत घेतली. अधिवेशनाचे 'सूत्रधार' तेच होते. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करणे जरूर आहे.

## आंतरजातीय विवाह मंडळाचा प्रथम वार्षिकोत्सव

मराठवाड्यातील आर्य समाजी विचाराच्या कार्यकर्त्यांनी स्थापन केलेल्या आंतरजातीय विवाह मंडळाचा पहिला वार्षिकोत्सव बीड जिल्ह्यातील रेणापूर गावी उत्साहाने साजरा झाला. आंतरजातीय विवाह केलेल्या परिवारांची एक मिरवणूक काढण्यात आली. श्री शेषराव वाघमारे, पंडित नरदेवजी स्नेही व श्री. कृष्णकुमार आदींची प्रभावी भाषणे झाली. सामर्थ्य संपन्न व सुसंघटित समाज निर्माण करण्याचे आंतरजातीय विवाह हे एक प्रमुख साधन आहे असे वक्त्यांनी सांगितले. ज्याप्रमाणे 'सजातीय' विवाह आपण 'जुळवितो' तसेच जाणीवपूर्वक जातीयता निर्मूलनाच्या उद्देशाने आंतरजातीय विवाह जुळवावेत. आंतरजातीय विवाह केलेल्या कुटुंबाची माहिती एकत्र नोंदरूपाने करून ठेवावी, त्यांचे प्रश्न सोडवावेत, आंतरजातीय विवाह करू इच्छिणाऱ्यांचे पत्ते घ्यावेत, आंतरजातीय विवाह केलेल्यांना व करू इच्छिणाऱ्यांना रूढिग्रस्त समाजाकडून येणारे अडथळे संघटित रूपाने दूर करावेत हे या मंडळाचे उद्दिष्ट असून त्या संबंधी विचार-विनिमय करण्यात आला. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची नववर्षासाठी निवडणूक झाली असून त्यात सर्वश्री प्रा. हरिश्चंद्र रेणापूरकर, प्रा. तुंगार, किसनरावजी, माणिकरावजी, नरदेवजी ज्ञानकुमारजी, हरिश्चंद्रजी औरादकर, विश्वनाथराव संभा राऊत रामस्वरुप लोखंडे आदींचा समावेश आहे. (या संबंधी अधिक माहितीसाठी श्री राम-स्वरूप लोखंडे आर्यसमाज रेणापूर, जि. बीड किंवा प्रा. तुंगार आर्यसमाज, नांदेड या पत्त्यावर संपर्क साधता येईल.)

## 'आख्यान रत्नमाला'चा प्रकाशन समारंभ

मराठवाड्यातील सुप्रसिद्ध दिवंगत कवि श्री दे. ल. महाजन यांनी लिहिलेल्या 'आख्यान रत्नमाला' (सर चौथा) या पुस्तकाचे प्रकाशन नांदेडच्या प्रतिभा नाट्य मंदिरात श्री. दासगणूमहाराजांचे शिष्य श्री. अनंत महाराज आठवले यांच्या शुभ-हस्ते झाले. प्रा. नरहर कुरुंदकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की ते स्वतः नास्तिक आहेत. कै. दे. ल. महाजन यांच्या प्रवृत्तिपेक्षा त्यांची प्रवृत्ति भिन्न आहे पण 'मराठीचे प्रेम' हा दोघात समान दुवा आहे. आध्यात्माच्या दरबारात सर्व साधुसंत– हिंदु मुस्लीम व ख्रिश्चन धर्मीय संत– सारखेच मानून राष्ट्रैक्याची भावना निर्माण झाली पाहिजे. मानवी नैतिकतेवर भर देऊन विश्वबंधुत्वाशी असलेल्या 'आदी-

शक्ती 'कडे लक्ष देऊन वैयक्तिक जीवन शुद्ध करण्याचा संतांनी प्रयत्न केला, असेही प्रा. कुरुंदकर यांनी प्रतिपादन केले.

श्री. अनंतमहाराज आठवले यांनी समाजात जे अस्वास्थ्य, अशांती आणि असंतोष दिसत आहे त्यास मुख्यत: नास्तिक म्हणविणारे तथाकथित सुशिक्षित बुद्धिवादीच जबाबदार असून थोर संत परंपराच मानवाचे कल्याण साधील असा विश्वास व्यक्त करून ' नास्तिक ' ' बुद्धिवादी ' म्हणवून घेऊन पुरोगामित्वाचा टेंभा मिरविणे थांबविले पाहिजे तसे आवाहन केले. कीर्तन परंपरेचे थोर पाईक श्री. दे. ल. महाजन यांनी आजीवन हेच महत्त्वाचे कार्य केले. संत परंपरेतील कीर्तनकारांनी नेहमीच सर्वधर्मसमावेशक धोरण ठेवले व ' संत तो आपलाच ' अशी नेहमी जाणीव ठेवली असे आग्रहपूर्वक प्रा. आठवले यांनीं प्रतिपादन केले. आध्यात्मिक व संतपरंपरेत काही चिन्हे, प्रतीके वेगवेगळी असतात पण आद्य हेतु मानव कल्याणच असतो. आज बालगुन्हेगारी वाढली तर देशाचा ' विकास ' होत आहे असे समजले जाते, याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. ' राष्ट्रीय कीर्तनकार ' हा शब्दप्रयोगच चुकीचा आहे. कीर्तनकार हा राष्ट्रीयच असतो. त्याच्या नावामागे ' राष्ट्रीय ' विशेषण लावण्याची गरजच नसते. महाजनांची कविता पंडिती छापाची आहे. त्यामुळे रसिकांना ती उदंड समाधान देते असेही श्री आठवले यांनी सांगितले.

महाजन साहित्य प्रकाशन मंडळाचे चिटणीस श्री. वि. द. सर्जे गुरुजी यांचेही या प्रसंगी भाषण झाले. मंडळाचे अध्यक्ष श्री. आनंदीदासराव लव्हेकर यांनी अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात कै. दे. ल. महाजन यांची शिष्यपरंपराही फार मोठी आहे असे सांगून सुप्रसिद्ध कवि वा. रा. कांत, कृष्णाकुमार, यादवसुत, देव आदी महाजनांचे शिष्य आहेत असे सांगितले.

आख्यान रत्नमाला सर चौथा या पुस्तकास श्री. धुंडा महाराज देगलूरकर यांची विवेचक व रसग्रहणात्मक प्रस्तावना लाभली आहे. सदर पुस्तकात गोस्वामी तुलसीदास, भक्त हरिदास, पतितोद्धार, संत एकनाथ, श्रीकृष्ण जन्म, श्री. शिवरात्री माहात्म्य, श्री भानुदासचरित्र, यावर आख्याने आहेत. घरीदारी, विद्यालयात संस्कारी शिक्षणाची उणीव भासत असल्याने विद्वान अशा हरिदास वर्गाची आज गरज आहे. आवड व पूरक व्यवसाय म्हणून काही सुशिक्षित कीर्तनाकडे वळत आहेत. अशा व्यक्तींना सदर पुस्तक उपयुक्त वाटेल.

□ □ □

## रंगलेल्या भिंती–विसरलेली आश्वासनं

मुंबई महापालिकेच्या गेल्या गाजलेल्या निवडणुकांची आज नकळत आठवण होत आहे. त्यावेळी सर्व पक्षोपक्षांनी दिलेल्या एका आश्वासनाचीही प्रखरपणे आठवण होत आहे. शिवसेनेसह बऱ्याच पक्षांनी त्या वेळी आश्वासन दिलं होतं–' निवडणुका होताच रंगलेल्या सर्वत्र भिंती साफ केल्या जातील !" लोकसभेच्या होऊ घातलेल्या निवडणुकांच्या निमित्तानं विविध घोषणांनी, परस्पर विरोधी वाक्बाणांनी आजही देशात सर्वत्र असंख्य भिंती रंगत आहेत. अगदी कालच बांधकाम संपून दिमाखात उभ्या असलेल्या नव्या इमारतींच्या भिंतीही ह्या तडाख्यातून कुठे सुटल्या नाहीत, मुंबईतून उत्तर प्रदेशातल्या एक दोन गावातनं, घरमालकांनी भिंती रंगवण्यास आक्षेप घेताच त्यांना मारहाण झाल्याच्याही बातम्या आहेत. ह्या बातम्या डोळ्यासमोर रोजच्या रोज रंगत असणाऱ्या भिंती– ह्यामुळेच ६९ मधल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकांच्या वेळच्या आश्वासनांची आठवण झाली.

काय झालं त्या आश्वासनांचं ? अर्थातच त्या वेळी रंगत असलेल्या भिंती पाहताना, ह्या लौकरच साफ होणार आहेत असा दिलासा त्या आश्वासनानं दिला होता. त्या साऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली गेली ! त्यावेळी रंगलेल्या घोषणा आजही अनेक ठिकाणी दिसून येतात. त्यांच्याच जोडीला किंवा– चे उमेदवार श्री––––'ह्या ठिकाणी योग्य ते फेरफार करून त्या ठिकाणी नवीन उमेदवारांचं नाव लिहून काढायचे उपद्व्याप चालू आहेत. साहजिकच आश्वासनं पाळली न गेल्याने, रंगलेल्या भिंती तशाच राहिल्याने घरमालक चिडले. त्यांतनंच त्यांनी काही ठिकाणी ह्या वेळी विरोध करून पाहिला; नि मार खाल्ला.

पण हे घरमालक का चिडले तेच मला समजत नाही. वास्तविक 'लोकशाही भारतात' ते आता तब्बल वीस वर्षे राहात आहेत. एवढ्या काळातही जर ते राजकीय पक्षांची आश्वासनं केवळ न पाळण्यासाठीच असतात हे ओळखू शकले नसतील तर ते आश्चर्यचं मानावं लागेल. विशेष म्हणजे हीच मंडळी भाडेकरूंच्या वायद्यावर कधीही विसंबायला तयार नसतात आणि तरीही त्यांनी राजकीय आश्वासनांवर विश्वास ठेवावा हे आश्चर्यच नाही का ? खरं म्हणजे तमाम जनतेने सर्व राजकीय आश्वासनांचा नीट अर्थ लावायला आता शिकलं पाहिजे. तसा ते शिकले असते, तर बँक राष्ट्रीयीकरणाने त्यांना धक्का दिला नसता. लोकसभेच्या निवडणुकांच्या घोषणेनं त्यांच्यावर आश्चर्यचकित व्हायची पाळी आली नसती. बेळ-

गाव प्रश्न लौकरच सुटणार आहे अशा भ्रमात ते राहिले नसते किंवा कोकण मागासला राहिला म्हणून चिडायची पाळीही त्यांच्यावर आली नसती! इथून पुढे तरी निदान लोकांनी आश्वासनांचा नीट अर्थ लावायला शिकलं पाहिजे. उदाहरणार्थ—

—दोन वर्षांत अन्नधान्याबाबतीत स्वयंपूर्णता म्हणजे दोन वर्षांत व पुढेही अमेरिकन गव्हाचीच पोळी खावी लागणार!

—जातीयवादाचं निर्मूलन होणार म्हणजे कुणाशीही बोलताना त्याची जात कुठली आहे ते आधी नीट पाहून घ्या.

—झोपडपट्ट्यांचं संपूर्ण निर्मूलन म्हणजे बड्या पाहुण्यांसाठी राखलेल्या खास राजमार्गांव्यतिरिक्त इतरत्र प्रचंड झोपडपट्ट्या!

—कोकण रेल्वे चौथ्या योजनेत म्हणजे पाचव्या योजनेपर्यंत तरी निश्चित नाही!

—समाजवादी लोकशाही म्हणजे पुढारी-मंत्र्यांच्या ऐषारामी उधळपट्टीसाठी सामान्य जनतेची भरडणूक!

वगैरे वगैरे!

## लाठ्या चालतील, गोळ्या छातीवर झेलू, पण....

निवडणुकींच्या काळात तर घोषणांना ऊत येतो. आवेशपूर्ण वक्तव्याला बहर येतो. त्या भरात वीरतापूर्ण वाक्ये, जोषपूर्ण आविर्भावात उच्चारली जातात. अशाच एका निवडणूक प्रचारसभेत वक्त्याचं भाषण रंगात आलं होतं. तावातावात तो सत्ताधारी पक्षाच्या दडपादडपीच्या कृत्यांवर टीकास्त्र सोडीत होता. विरोधकांना नामोहरम करण्यासाठी पोलिसी दंडुकेशाहीचा वापर सरकार कसं करत ते खुलवून सांगितलं जात होतं. '... एवढी दडपशाही करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी पण हे लक्षात ठेवलं पाहिजे की आम्हीही मेल्या आईचं दूध प्यालेले नाही आहोत. त्यांच्या लाठ्यांना, दंडुक्यांना आम्ही डरणार नाही. त्यांच्या बंदुकांच्या गोळ्या आमचे आवाज गोठवू शकणार नाहीत. लाठ्यांचा मार सहन करू, छातीवर गोळ्या आम्ही झेलू, पण आम्ही इथनं इंचभरही हलणार नाही......'

वक्त्याच्या ह्या वाक्यासरशी ५-७ हजारांच्या त्या सभेत एकाएकी गोंधळ माजला. दीड-दोन हजार श्रोते एकाएकी उठून उभे राहिले आणि वाट फुटेल तिकडे सैरावैरा धावत सुटले. सभेच्या व्यासपीठावरच्या वक्त्यांना, नेत्यांना, कार्यकर्त्यांना काय झालं तेच कळेना. जिवाच्या आकांताने ओरडत पळत सुटलेल्या श्रोत्यांकडे पाहत, बंदोबस्तासाठी उपस्थित असलेले पोलीस अधिकारी डोकी खाजवत उभे राहिले तर सुरक्षा-दलाच्या कर्मचाऱ्यांनी आपापल्या पिस्तुलांना हात घातला. परंतु पळणारे

श्रोते किंवा इतर जमाव ह्यात कसलीही मारामारी झालेली नसून ते सारेच कमालीचे घाबरलेले आहेत हे ते सुरक्षा–कर्मचारीही आ वासून पाहतच राहिले. शेवटी थोडं स्थिरस्थावर होताच पोलीस अधिकाऱ्यांनी पुढे होऊन चौकशी केली. चौकशीतनं निष्पन्न झालं—

ह्या साऱ्या धमालीचं कारण होतं दोन घुशी ! त्या दोघी, वक्त्याच्या आवेशपूर्ण वाक्याची वेळ साधत, स्टेजखालून बाहेर पडल्या व थेट श्रोतृवृंदात शिरल्या. त्यांच्या आगमनाबरोबर एकदोघांनी उड्या मारल्या. इतरांनी अनुकरण केलं. अन् मग एकच धावपळ उडाली.

सभेच्या बंदोबस्तासाठी दोन हवालदार ह्या संबंधात खुमासदार चर्चा करत होते. हातावर तंबाखू चोळत एक म्हणाला, " च्यायला, घुशीनं तर धमाल उडवून दिली. पार नक्षा उतरून टाकला सगळ्यांचा."

बाजूनं जाणारा एक तरुण मिस्किलपणे म्हणाला, " हवालदारजी, हा तर न्याय आहे जगाचा. खानेमे हम, लडनेमे आप ! घुशीनं फक्त प्रात्यक्षिक दाखवलं !"

घुशींचा हा पराक्रम नुकताच मुंबईत घडला. स्थळ : कॉटन एक्स्चेंजजवळचं मैदान नि त्यात भरलेली इंदिरा–विरोधी आघाडीची प्रचारसभा !

## खरंच का ?

राजकीय नेत्यांच्या आश्वासनांविषयी शंका प्रकट करावी अशीच परिस्थिती सध्या तरी आहे. परंतु सेनानींची आश्वासनं तशी नसावीत असं वाटतं. कुठल्याही परकी आक्रमणाचा समर्थ समाचार घेता येईल एवढं सामर्थ्य भारतीय सेनेकडे निश्चित आहे असा दिलासा भारताच्या आजी-माजी सेनाप्रमुखांनी नुकताच दिला आहे. ज. माणेकशांनी ठाम शब्दात हा विश्वास व्यक्त केला, तर ज. चौधरींनी त्याला दुजोरा देतानाच, भारतानं अण्वस्त्र बनवावीत असं सुचवलं आहे. अण्वस्त्र बनवावीत का नाही हा सर्वस्वी मंत्रिमंडळाच्या अखत्यारातला प्रश्न आहे. अर्थातच त्यावरच ज. चौधरींचं मत विचार करायला लावणार आहेच. पण त्याशिवायही, त्यांनी व ज. माणेकशांनी दिलेला दिलासा महत्त्वाचा आहे.

पण नकळत शंका येते, हे खरं का ? बासष्टपूर्वीही असाच दिलासा भारतीय जनतेला ज. कौल व मेनन ह्यांनी दिला नव्हता का ? शिवाय, कालचे सेनानी आज राजकारणात शिरत आहेत.

पण ह्या गंभीर बाबतीतले सेनानींचं आश्वासन राजकीय पद्धतीचं नसावं, अशी आशा बाळगू या !

विनोद

# भेट

मख्ख चेहऱ्याच्या, अंगभर दाट लव असलेल्या मेट्रन जाड भिंगांच्या चष्म्यातून त्याला न्याहाळतात. कपाळावर आठ्या चढवून, त्रासिक स्वरात पुन्हा विचारतात, " कुणाला भेटायचंय म्हणालात ?"

" नलूला. नलिनी देशपांडेला. "

" तुम्ही तिच्या नातेवाइकापैकी का ?" मेट्रनचे डोळे आता संशयानं त्याच्यावर रोखलेले असतात.

" अं–हो. मामेभाऊ मी तिचा. "

त्या उत्तरानं त्यांचं समाधान झालेलं नसतं. अंगावर चढू पाहणारं झुरळ झटकावं तसं त्या सांगून टाकतात, " तुम्ही उद्या सकाळी या. संध्याकाळी सातनंतर आम्ही कुणाला बाहेर सोडत नाही. "

" पण...पण..." काय बोलावं त्याला कळत नाही. एवढी पायपीट करून इथं आलो. केवळ नलूला भेटायला. तिला डोळाभर पाहायला. तसंच परत फिरावं लागतं की काय ? तो काकुळतीनं म्हणतो, " आता रात्रीच्या गाडीनं परत जायचंय मला. जरुरीचा निरोप आहे. फक्त दहा-पंधरा मिनिटं भेटली तरी पुरे..." आणि आशाळभूतपणे तो मेट्रनकडे पाहतो.

त्या चिडचिडत उठतात. आपला स्थूल देह झुलवत जाताना मागं उभ्या असलेल्या मेडला सांगतात, " जा ग. त्या सतरा नंबरमधल्या देशपांडेला म्हणावं तिचा मामेभाऊ आलाय. "

उत्सुक डोळ्यांनी तो तिची वाट पाहू लागतो.



पाच मिनिटांत त्याला नलू येताना दिसते. जराशी थकलेली. पण त्याला पाहून ती उमलते. अस्फुट म्हणते, " तू ?"

तो हसतो. दूरच्या दारात अजून मेट्रन उभ्या असतात, नलूवर बारीक नजर ठेवून. त्याला गुदमरल्यासारखं वाटतं. तो म्हणतो, " जरा बाहेर चलशील ? किती उकडतंय इथं. अजिबात वारा नाही येत."

तिला त्याचं बोलणं उमगतं. म्हणते, " थांब. आलेच मी."

भराभर ती मेट्रनकडे जाते. त्यांचं बोलणं त्याला ऐकू येत नाही. फक्त मेट्रनचे हातवारे दिसतात. क्षणभरानं नलू परत येऊन म्हणते, " चल."

पायऱ्या उतरून ती दोघं बाहेर येतात. बाहेरच्या माळावर शुभ्र स्वच्छंद चांदणं पसरलेलं असतं. गार वारं झिरमिळत असतं.

' असंच कुठवर जायचं ग ? त्या झाडाखाली बसू जरा."

नलू त्याच्या मागोमाग जाते. झाडाच्या चांदण्यातल्या सावलीत ती दोघं बसतात. वर गर्द पानातून चंद्र डोकावत असतो.

" मघाशी मी जरा गोंधळलेच बघ. म्हटलं हा मामेभाऊ कोण आला माझा ?" ती सांगते, " यायचं होतं तर आधी पत्र तरी पाठवायचं रे. पण आधी सांग —

असा अचानक कसा आलास ? घरी सगळी ठीक आहेत ना ?"

"आज सकाळी उठलो. आणि एकदम कॅलेण्डरवरच्या तारखेकडं लक्ष गेलं. सात जानेवारी. तुझा वाढदिवस ना आज ? वाढदिवसाची भेट द्यायला आलोय मुद्दाम. तुझ्या आवडत्या मोतिया रंगाची साडी आणलीय आणि आमच्या अंगणा. तल्या मोगऱ्याचा गजरा. पण फुलं सुकून गेलीत बघ..."

ब्राउनपेपरमध्ये बांधलेली साडी तो तिच्या मांडीवर ठेवतो. कर्दळीच्या पानात बांधलेला गजरा. त्याचा गंध तिच्याभोवती परमळतो.

"बघ ना सोडून. तुला आवडते का साडी."

"तुझी निवड कधीच चुकीची नसते. पण..." ती अडखळते.

"पण काय ग ?"

"कशाला उगाच इतके पैसे खर्च केलेस माझ्यासाठी...? बरं, तुझी परीक्षा केव्हाय."

"मार्चमध्ये." तो सांगतो आणि क्षणभरानं म्हणतो, "नलू, कधी वाटतं, मी उगाच तुला फार त्रास देतो. तू इथं राब राब राबतेस. आजाऱ्यांच्या जखमा धुतेस. औषधांचा कडवट दर्प सहन करावा लागतो तुला. मी शिकतोय. चमत्कारिक आहे ना सगळं हे ? त्यापेक्षा मिळेल ती नोकरी पत्करावी. पण तुला इथून सोडवावं..."

"आपलं काय ठरलंय आठवतं ना तुला ?"

"काय ?"

"परीक्षा होऊन तुझा रिझल्ट लागेपर्यंत या विषयावर अजिबात बोलायचं नाही. आणि हे रे काय ? दाढी किती वाढवलीस ? कुणाला वाटावं, तुरुंगातून नुकता सुटलेला चोरबिर असावा !"

तो खळखळून हसतो. बोटभर दाढीवरून मौजेनं हात फिरवत विचारतो, "बाकी दाढी शोभून दिसते नाही ग मला ?"

"पण एकदम आजाऱ्यासारखा दिसतोस बाबा तू. गाल किती आत ओढलेत तुझे."

"छे ग. पाचसहा महिन्यांनी पाहते आहेस मला. जवळचं माणूस फार दिवसांनी भेटलं म्हणजे असंच वाटतं. बरं, तुझ्याबद्दल काही सांग की."

"काय सांगू ?"

"इथं एकटं नाही वाटत ?"

"तसं थोडं वाटतं की. पण एकटी असले म्हणजे. बाकी वेळ कसा जातो कळत नाही. गेल्या महिन्यात एक म्हैसूरची मुलगी आली आहे रूममेट म्हणून. सरोज तिचं नाव. इतकी बोलभांड आहे आणि काळेभोर सुंदर डोळे आहेत बघ तिचे. मी तिला तुझा फोटो दाखविला."

"आणि काय सांगितलंस ?"

"काही सांगावं लागलंच नाही. तिनं ओळखलं सगळं. आता जेव्हा तेव्हा थट्टा करते तुझ्यावरून!" सांगता सांगताच नलू लाजते. वाऱ्यानं फडफडणारा पदर शालीनपणे डोकीवरून घेते.

तो तिच्याकडे टक लावून पाहात राहतो.

मोगऱ्याचा गजरा हुंगत ती विचारते, "असा काय नुसता बघतच राहिलायस माझ्याकडे ?"

तो मंद हसत म्हणतो, "असा डोक्यावरून पदर घेतलास ना, एकदम लाजवाब दिसतेस तू!, लाजवंती जणू. कधी कधी तुझी आठवण फार छळते बघ. समोर पुस्तकातली अक्षरं पुसून जातात. तुझं चित्र तिथं उमटतं."

"असं ? मग काय करतोस ?" तिचे डोळे प्रेमानं तुडुंबतात.

"मग छान चंदनी वासाची उदबत्ती पेटवतो. डोळे मिटून तिचा छाताभर सुवास हुंगत बसतो. वाटतं, तूच भवतीभवती दरवळत आहेस!"

भोवतालच्या चांदण्याकडं, हलकेच डुलणाऱ्या सावलीकडं, दूरवरच्या हॉस्पिट-लच्या दिव्यांच्या टिंबाकडे ती दोघं पाहात राहतात.

जरा वेळानं ती विचारते, "बाबा कधी भेटले होते ?"

"एकदा मार्केटात सामोरे आले होते. पण मला पाहताच दुसरीकडे वळले. मी हाक मारली त्यांना. पण वळून पाहिलं नाही त्यांनी."

ती हलकेच सुस्कारा टाकते.

"नलू, माझ्यासाठी तू आईवडलांशी भांडलीस. माझ्यासाठी घर सोडलंस. मायेची माणसं सोडलीस. अपराधी वाटतं बघ मला." त्याचा आवाज कातर होतो.

"अशा गोष्टी फारशा मनाला लावून घ्यायच्या नसतात. फक्त आपण स्वतःला विचारायचं – माझं काही चुकतंय का ? मी कुणावर अन्याय करणार आहे का ? आपलं मन निर्मळ असलं म्हणजे झालं. आईवडील आज रागावतील. पण उद्या प्रेमानं मिठीत घेतील. दिवस उलटतात तशी माणसं बदलतात. दुरावलेली नाती पुन्हा सांधतात. आता माझंच सांगते. बाबांचं कधी पत्र येत नाही. पण मी मात्र दर पंधरा दिवसांनी न चुकता पत्र पाठवते. खुशाली कळवते. परवा आईनं निरोप धाडलाय – पोरी, पाहावंसं झालंय तुला. एकदा येऊन जा..."

जरा वेळ ती स्वतःतच हरवून जाते.

तो विचारतो, "तुला वेळ नाही ना झाला ? ती मेट्रन भारी कडक दिसते ग."

"होय. आम्ही सगळ्यांनी तिचं नाव झांटिपी ठेवलंय. आता मला इथं येऊ द्यायलाच तयार नव्हती. म्हटलं, पाच मिनिटांत येते."

"पाच मिनिटात ? आता तर वीस मिनिटं होऊन गेली. चल तू आता, नलू. उगाच माझ्यासाठी तुला बोलणी खायची नकोत."

" जाऊया. बस रे. पण तू आता रात्री कुठं राहणार आहेस ?"

" स्टॅण्डवर लॉज आहे ना, तिथं सांगून आलोय. सकाळी साडेपाचची पहिली गाडी धरायची."

" ही झांटिपी जर हेड म्हणून नसती तर इथंच कुठंतरी तुझी सोय केली असती."

चांदण्यात भिजलेले आणखी काही क्षण असेच निघून जातात. मग तो उठत म्हणतो, ' चल तू आता."

तीही उठते. त्यानं दिलेली साडी छातीशी बिलगून धरते.

चालताना सांगते, " आता दोन महिने माझी आठवणही काढायची नाही बघ. फक्त अभ्यास. तुझे पेपर कधी आहेत ते कळव. मी इथल्या वृंदावनातल्या कृष्णाला त्या दिवशी तुळस वाहीन !"

त्याचा ऊर भरून येतो. वाटतं, प्रेमाची बरसात करणाऱ्या या पोरीला जवळ ओढावं. बाहूंच्या माळा तिच्या गळयात घालाव्यात. आणि चंद्रसूर्य आकाशात आहेत तोंवर तिला बिलगून राहावं...


ती दोघं प्रवेशद्वाराजवळ येतात. ती एकेक पायरी चढत वर जाते. वळते. त्याच्याकडे पाहत म्हणते, " जा. जपून राहा. पत्र पाठवीनच मी." आणि ती निरोपादाखल मोगऱ्यांच्या कळयाप्रमाणं हसते.

तो हात उंचावतो. माघारी वळतो. पाच-सहा पावलं चालून पुन्हा मागं पाहतो. दाराशी अजून नलू उभी असते. एकाकी. त्याच्या वाटेवर नजर स्थिर ठेवून.

तो चालू लागतो. समोर अफाट पसरलेला माळ. वर हसणारा चंद्र. त्याचे दोन्ही हात खिशात जातात. दहा पैशांचं नाणं तेवढं हाताला लागतं.

वीस मैलांचा रस्ता कापून आपण गावी केव्हा पोचू याचा अंदाज करीत तो शीळ घालत पावलं टाकू लागतो.

नलूला सांगितलेलं लॉजिंग केव्हाच मागं पडलेलं असतं...गार भन्नाट वारं त्याच्याभोवती गिरक्या घेत असतं.




युद्धस्य कथा

# मॅक्स मॅन्युस

संजीवनी खेर

रुग्णालयाच्या बिछान्यावर पडल्या पडल्या मॅक्स मॅन्यूसने हे ऐकले, 'ह्या माणसाला मारण्यात काही अर्थच नाही. ह्याला ह्याच्या मौतीनेच मरू द्या. नाही तरी पाठीचे हाड पूर्ण तुटलेल्या व इतर गंभीर जखमांमुळे हा कोणत्याही क्षणी इहलोक सोडून जाण्याची शक्यता आहे.' इतके ऐकून मॅक्स पुनः बेशुद्ध पडला. तो जेव्हा शुद्धीवर आला तेव्हा डॉक्टर व नर्स त्याच्या शेजारी उभे होते. डॉक्टर बाहेरच्या कडक बंदोबस्ताची नजर चुकवून त्याला म्हणाले, "हे पाहा, तुम्ही निराश होऊ नका. तुमच्या पाठीचे हाड तुटलेले नाही व तुमचा मृत्यूही जवळ आलेला नाही. तुम्ही थोड्या दिवसांतच बरे व्हाल." हे ऐकून मॅक्सच्या जिवात जीव आला. त्याला इतक्यात मरायचे नव्हते अन् शत्रूच्या छावणीत तर मुळीच नाही. मातृभूमीची सेवा करायची, शत्रूला हुलकावणी द्यायची स्वप्ने तो जखमांच्या वेदनांमध्येही पहात होता. त्याची इच्छाशक्ती जबर होती, त्याहून त्याची कल्पनाशक्ती व धैर्य अतुलनीय होते. रुग्णालयातील बिछाना त्याला बोचत होता. कर्तव्य त्याला क्षणोक्षणी साद घालत होते अन् ह्या पंगू अवस्थेत तरुण नॉर्वेजियन मॅक्स पलायनाच्या योजना आखत होता.

रुग्णालयात त्याला आणले गेले त्या अगोदरच्या रात्रीचा प्रसंग त्याच्या मनःचक्षूंसमोर तरळू लागला व आपल्या उतावळेपणाने आपण पकडले गेलोय अन् तेही जखमी होऊन. त्यामुळे त्याला स्वतःचाच राग येत होता, पण त्याप्रसंगी त्याला काहीच सुचले नव्हते. नॉर्वेच्या प्रतिकारक चळवळीत तो नुकताच दाखल झाला होता. युद्धाचा डोंब सर्वत्र पसरत होता. गवताने भरलेल्या कोठाराला ठिणगी पडायचाच अवकाश असतो तशीच ह्या युद्धवणव्याची आग १९४१ मध्ये वायुवेगाने देशांमागून देशांत पसरत होती. अशा जीवनअस्तित्वाच्या प्रसंगी तळहातावर शीर घेऊन मातृभूमीच्या, मित्रराष्ट्रांच्या मदतीला आपल्या मुंगीएवढ्या तरी कामाने, त्यागाने मदत व्हावी ह्या ध्येयाने भारलेल्या, कार्य करून विजयी झालेल्या वीरांमध्ये मॅक्स मॅन्यूसची गणना करावी लागेल. प्रतिकारक चळवळीत भाग घेतानाच



या पराक्रमातच तो पकडला गेला

त्यातील धोक्याची मॅक्सला पूर्ण जाणीव होती. कित्येकदा पुढे काय, कसे ! केव्हा? ह्यांच्या भीतीने तो वेढलेला असे. रुग्णालयात यायच्या आदल्या रात्री घरी परत येताना दारातच त्याला काही सैनिकांनी हटकले. त्याला काही समजायच्या आतच त्याच्या पॅडेड कोटाची पाठ टर्‌कन फाडली गेली. सैनिकांना (शत्रू) हवा असलेला पुरावा त्यातून बाहेर पडला. मॅक्सची जिवाच्या भीतीने नव्हे, बहुमूल्य कागदांच्या भवितव्याने गाळण उडाली. त्याच्या खोलीची रीतसर तपासणी सुरू झाली. बाथरूममध्ये जाण्याची मॅक्स वाट पहात होता, कारण तिथे हॅंडग्रेनेडस् लपवून ठेवलेली होती. परंतु दोन सैनिक त्याच्या इतके निकट उभे होते की त्यांना टाळणे मॅक्सला शक्य नव्हते. स्वतःला व दुसऱ्यांना काही कळायच्या आतच खिडकीचा अंदाज घेऊन, चार डोळे त्याच्यावर रोखलेले असतानाही मॅक्स तिरासारखा खिडकीच्या काचा भेदून दुसऱ्या मजल्यावरून खाली झेपावला आणि ह्या पराक्रमातच जबर जखमी अवस्थेत सैनिकांनी त्याला अटक केली व लष्करी रुग्णालयात दाखल केले. दोन सशस्त्र सैनिक त्याच्यावर सतत डोळ्यात तेल घालून पहारा करीत होते. पण ह्या अडचणींची नुसती कुरकुर करून वा हतबुद्ध, निराश होऊन कार्यभाग साधणार नव्हता. मॅक्सने नर्सची सहानुभूती व मदत मिळविण्याचे ठरविले. तिला विश्वासात घेऊन सारे सांगितले व सूचना दिल्या. दुसऱ्या दिवशी बॅंडेजच्या सामानात तिने फिशिंग रॉड, दोरखंड लपवून आणला. पहाटे ३ वाजता मॅक्सला तयार रहावयाची सूचना केली. त्याचे मित्र बाहेर सर्व व्यवस्था करून वाट पहाणार होते. मॅक्सला त्या रात्री क्षणभरही झोप आली नाही. डोळ्यांच्या पिंजऱ्यात ती यायला तयार नव्हती. स्वतंत्र मुक्ततेची वाट पहाण्यात ती क्षण

मोजत होती. रात्रीची पळे कासवाच्या गतीने जात होती. रात्रीचा अंधार दाट होत होता. बाहेरच्या कर्तव्यदक्ष सैनिकांनाही पेंग येत होती. ते सैनिकही त्या पहाऱ्याला (मृत्युमुखी पडलेल्या कैद्यावरच्या) कंटाळलेले होते. खाटेवरचा रुग्ण सुटकेच्या क्षणाची प्रतीक्षा करीत होता. तो अगदी बेचैन झाला होता. पलायनाची तयारी काटेकोरपणे झालेली होती. त्याने ठीक ३ वाजता खिडकीच्या वरच्या चिंचोळ्या शटरमधून दोर बाहेर सोडला. अंगावरच्या जखमा त्याला हतबल, बेजार करीत असताही सर्व शक्ती एकवटून मॅक्स सापासारखा वळवळत बाहेर पडला. बाहेरच्या तुफानी, थंडगार वाऱ्याचा मारा चाबकाच्या फटकाऱ्यासारखा त्याच्या जखमांवर होऊ लागला. त्याच्या सहकाऱ्यांनी अलगद ब्लँकेटमध्ये त्याला गुंडाळून घेतले व कारमध्ये नेले. भयाण अंधारात कार दिसेनाशी झाली.

त्यानंतर मात्र मॅक्स शत्रूच्या तावडीत कधीच सापडला नाही. शत्रूच्या विनाशाच्या अनेक कटांमध्ये त्याने यशस्वी कारवाया केल्या. नात्झींच्या ॲसिडस्, बॉम्ब्स् विमान फॅक्टरींचा धुव्वा उडविला. परंतु त्याच्या सर्व कृत्यांमधील गौरवशाली, धाडसी कृत्य म्हणजे त्याचा जर्मन सैनिकांची ने-आण करणाऱ्या अजस्र 'मॉन्टेरोझा'चा विध्वंस करण्याची योजना व त्याची सफलता.

मॉंटेरोझा बोट ओस्लो व जर्मनी ह्या दरम्यान सनिकांचे ने-आण करीत असे. मॉंटेरोझा बोट जेथे बांधली जावयाची तो समुद्रकिनाऱ्यालगतचा भाग विद्युत् प्रवाहांनी वेढलेला होता. दरवाज्यावर सैनिकांचा कडेकोट बंदोबस्त होताच. रोझा जेव्हा किनाऱ्यावर नांगर टाकून उभी असायची तेव्हा रात्रभर सर्चलाइटस् तिच्याभोवती सतत टाकले जात असत.

एका किनाऱ्यावर काम करणाऱ्या मजुराकडून मॅक्सला सुगावा लागला की बोटी जेव्हा धक्क्यावर उभ्या असतात तेव्हा धक्क्याच्या आतील (याव्याकडील) बाजूला लोखंडी तुळया टाकलेल्या आहेत. त्यावर एक माणूस सहज निजू शकतो बस्स, इतकीशी बातमी मॅक्सच्या यंत्रणेला पुरेशी होती. रोझाचा विनाश = दोन देशभक्तांचा प्राण असे गणित नक्की झाले.

झपाटल्यागत मॅक्स व सरकारी उत्साहाने काळजीपूर्वक कामाला लागले. दोघांनी केवळ दुरुस्ती करणाऱ्या कामगारांचे सोंग वठवायचे ठरविले. सामानाची ने- आण करणाऱ्या गाडीचा ड्रायव्हर होता मॅक्स व गाडीच्या खणात केबल्स बरोबर भरपूर स्फोटक द्रव्यही भरून ठेवलेले होते. धक्क्याच्या गेटापाशी येताच रक्षकाने त्यांना हटकले. साळसूदपणे आवश्यक ती कागदपत्रे दाखवून गाडी पुढे जाऊ लागली. रक्षकाला गाडीची पुरती झडती घ्यायची होती. तो तसे करणार इतक्यात दुसरी एक गाडी तेथे येऊन धडकली. तिचा ड्रायव्हर लवकर तपासणीसाठी जलदी करू लागला. रक्षकाने चिडून मॅक्सचा गाडीचे काम सोडून दुसऱ्या गाडीचे कागदपत्र पहायला घेतले. मॅक्सने हळूच गाडी बंदरात नेली व गाडीतल्या स्फोटक

द्रव्याच्या पेटचा गोदीच्या विशेष वापरल्या न जाणाऱ्या पण सर्वांना दिसतील अशाच ठिकाणी ठेवल्या दुसरे दिवशी पुन: ते कामगार कामावर हजर झाले. आता त्या पेटघा त्यांना गोदीच्या आतल्या विभागात न्यायच्या होत्या. इतर तारांच्या भेंडोळचात त्या स्फोटक द्रव्याच्या पेटचाही ते बंदराच्या आतील भागात नेऊ लागले असता, खाली उतरण्याच्याच्या अरुंद शिडीवरून खाली जाताना सैनिकाने त्याना हटकले. परंतु मॅक्सने सहजपणे त्याला सांगितले, " अरे बाबा दुरुस्तीच्या कामाला आत जातोय, ह्या जड पेटघांना आत न्यायला जरा मदत कर ना ?' आणि त्यांच्या मदतीनेच मॅक्सने आपले सामान इच्छित जागी नेले. बंदराच्या खालच्या भागात अंधार होता. लोखंडी तुळघा थंडगार व बुळबुळीत झालेल्या होत्या. त्यांना त्या पेटचा बंदराच्या दुसऱ्या बाजूला न्यायच्या होत्या ज्या ठिकाणी रोझा नांगर टाकून विसावणार होती. खोल अंधाऱ्या गुहेसारखी ती जागा होती. बंदराच्या फळयांना लागलेले खिळे शर्ट फाडीत होते. ५० पौंड वजनाच्या पेटचा त्या अरुंद जागेतून नेणे एक दिव्य होते. ३ दिवसपर्यंत दोघे तिथे तुळयांवर निजून राहिले. बरोबरचे सँडविच व ब्रँडीने तेथील अज्ञातवास असह्य होता. पण १ दिवस मग उंदरांनी त्यांना हैराण करायला सुरुवात केली. त्यांच्या हल्ल्यांना तोंड देत ते तिथेच लपून होते. अखेर रोझा तेथे येऊन दोन दिवस थांबली. मॅक्स व अखेरच्या क्षणापर्यंत वाट पाहिली बोटीला टाइम बॉम्ब् बांधून त्यांनी तिथून काढता पाय घेतला. ते बाहेर पडले तेव्हा कोणाचेच त्यांच्याकडे लक्ष नव्हते. वारंवार तेथे जाण्याने ते परिचित झालेले होते.

काही दिवसांनी त्यांना बातमी कळली की, मॉन्टेरोझाचा पूर्ण विध्वंस झाला. आहे व सैनिकांसह तिला जलसमाधी मिळाली आहे. मॅक्सने अशाच कौशल्याने डोनाऊ ही बोटही बुडविली. मॅक्सचा सहकारी दुर्दैवाने पुढे मारला गेला. मॅक्स मात्र अत्यँत सावधगिरीने राहिला. १९४५ नार्वेत जर्मन शरण आल्यावर मॅक्सचा धैर्यशील नायक म्हणून गौरव झाला. ◻ ◻ ◻

---

हंसा वाडकर यांचे आत्मकथन

सांगत्ये ऐका

सांगत्ये ऐका

मूल्य आठ रुपये

राजहंस प्रकाशन

---



# निर्वाणीचे अस्त्र

## लेखांक दोन । सुभाष भिडे

सुंदर विलो वृक्षांबद्दल हिरोशिमाची सर्व जपानभर फार ख्याती होती. ३॥ वर्षांच्या युद्धात तोपर्यंत हिरोशिमावर फक्त १२ बॉम्ब पडले होते. अखेर मोठे बंदर व औद्योगिक शहर असलेल्या या सुंदर शहराभोवती यमदूताने आपले पाश आवळण्यास सुरुवात केली.

या बंदरातून तोपर्यंत १,००,००० तुकड्या आघाडीकडे गेल्या होत्या. तेथील डॉक बंद पडल्याने सगळीकडे कशी भयाण शांतता पसरली होती. सर्व मिळून फक्त २४,००० सैन्य हिरोशिमात होते. चढाईची बातच आता सोडून द्या. सर्वजण आता बचावाच्या पवित्र्यात होते. एकेकाळच्या गजबजलेल्या शहरावर मृतकळा पसरली होती.

अमेरिकनांनी केले नसेल इतके शहराचे नुकसान नागरिकांनी लष्कराच्या आज्ञेवरून केले होते. शहरातील मोठे वृक्ष भुईसपाट केले होते. तीन मोठी फायर-ब्रेक्स तयार करण्याकरिता ७०,००० घरे पाडून टाकली होती. शहरातील ३,८०,००० नागरिकांच्यापैकी ९०,००० चे सक्तीने स्थलांतर करण्यात आले होते. लवकरच होणाऱ्या अमेरिकन हल्ल्याला तोंड देण्यासाठी शहरांतील कारखाने, रेल्वेयार्ड, गुदामे कसेबसे चालू ठेवून थोडेफार उत्पादन करण्याचा व त्याचे दळणवळण चालू ठेवण्याचा प्रयत्न सुरू होता.

लोकांना जगण्यासाठी पुरेसे एवढे किमान धान्य देताना १९४५ मध्ये १ कोटी ४० लाख टन तांदळाचा तुडवडा पडेल असे पाहणी समितीने भाकित केल होते. जवळजवळ वर्षभर लष्कराला पुरेसे तेल मिळाले नव्हते. पितळ शिल्लक नसल्याने कसल्यातरी दुय्यम प्रतीच्या मालांतून तोफ गोळयांची कवचे केली जात होती. बांबूचे भाले काही तुकडयांना दिले होते. किनाऱ्याच्या संरक्षणासाठी फक्त काटेरी ताराच शिल्लक होत्या. कारण बंकर्स वगैरे बांधायला सिमेंटच शिल्लक नव्हते. तोफा जवळजवळ संपल्याच होत्या. त्यामुळे केवळ मशिनगन्च्या साहाय्याने डोंगरकपारी लढविल्या जाणार होत्या. अमेरिकन सैन्याला आपण फार काळ किनाऱ्यावर रोखून ठेवू शकणार नाही याची त्यांना खात्री पटली होती. नौदलाला पुरेसे इंधन नव्हते. त्यांतच अमेरिकन युद्धनौका व विमाने त्यांच्या चिंधडया उडवत होती. त्यामुळे नौदलसुद्धा विमानदलाप्रमाणेच 'कामिकाझे' पद्धत वापरू लागले. जुलैमध्ये, जपानच्या दक्षिणेकडील बंदरावर, फक्त एक वेळेचे इंधन (कारण परतीचा प्रवास करायचाच नव्हता) व भरपूर दारूगोळा घेऊन ७०० लहान विमाने अमेरिकन जहाजांची वाट पाहत होती.

सोमवार ६ ऑगस्ट १९४५ ला जपानवर अणुबॉंब टाकायचे निश्चित झाले होते. याची जबाबदारी 'स्पेशल बॉंबिंग मिशन नं. १३' यावर होती. टिबेट्स् व त्याच्या ६ सहकारी वैमानिकांच्यावर ही मोहिम सोपविली गेली.

४ ऑगस्टला या सात वैमानिकांना कॅ. विल्यम पारसन्सनी या मोहीमेचा सर्व तपशील व बारकावे सांगितले. न्यू मेक्सिकोच्या चाचणीचा चित्रपट दाखविला. तो प्रचंड स्फोट, आग वगैरे पाहिल्यावर इतक्या उंचीवर एकदम वळण्याचा सराव आपल्याला का करायला लावला याचा उलगडा सर्वांना झाला. किरणोत्सर्गाचा धोका टाळण्यासाठी स्फोटानंतर निर्माण होणाऱ्या ढगांतून न जाण्याची सूचना पारसन्सनी सर्वांना दिली. बॉंबस्फोटानंतर नक्की काय काय होईल याची कुणालाच कल्पना नाही हे त्यांनी मोकळेपणाने कबूल केले. पृथ्वीपासून १८५० फूट उंचीवर बॉंबचा स्फोट व्हावा अशी योजना केली असली तरीही स्फोटानंतर पृथ्वीच्या कवचावर परिणाम होण्याची शक्यता होती.

रविवारी, ५ ऑगस्टला अणुबॉंबानं नियनला आणण्यात आला. ५ फूट व्यासाच्या व १४ फूट लांबीच्या या बॉंबचे वजन केवळ १०,००० पौंड होते. मुख्य स्फोटक द्रव्याचे वजन याच्या ०·५ टक्के देखील नव्हते. बॉंबच्या अंतर्भागात ते ठेवले होते. पडणारा बॉंब पृथ्वीपासून १८५० फूटांवर आला की आतील फ्युजमुळे स्फोटक द्रव्याचा स्फोट होऊन दर सेकंदाला ५००० फुट या वेगाने लहानशा पिशवीतील यू–२३५ पुढे फेकले जाऊन बॉंब पुढील नाकासारख्या भागात ठेवलेल्या मोठ्या पिशवीतील यू–२३५ वर आदळेल व त्याचवेळी स्फोट होईल.

बॉंबमधील इतर इलेक्ट्रॉनिकची यंत्रणा फार गुंतागुंतीची होती. बॉंब टाकल्यापासून १५ सेकंदातच स्फोट होऊ नये म्हणून सर्व यंत्रणा १५ सेंकंदच बंद राहणार होती. बॉंबचा १०,००० फुटांच्यावर स्फोट होऊ नये म्हणूनही सोय होती. बॉंब टाकून १५ सेकंद झाल्यावर भारमापक यंत्र फ्यूज तयार ठेवील व बॉंब १८५० फुटांवर आल्याबरोबर कळ दाबली जाऊन स्फोट होईल. बॉंब सोडल्यापासून स्फोट होण्यामधील या ४३ सेकंदांच्या अवधीत सर्व काही घडणार होते.

यू–२३५ हा अत्यंत महत्त्वाचा घटक एका शिशाच्या सिलेंडरमध्ये घालून 'इंडियानापोलीस' या क्रूझरमधून बेटावर आणण्यात आला. वाटेत शत्रूने हल्ला केलाच तर पहिल्या मोटार लॉंचमधून हा पदार्थ पुढे पाठवायचा असा स्पष्ट आदेश या क्रूझरला दिला होता. सॅन्-फॅन्सिस्कोहून ती अत्यंत वेगाने निघाली. वाटेत इंधन घेण्यासाठी काही तासच पर्ल हार्बरला थांबून ती लिनियनला पोचली. (पुढे तीनच दिवसांनी जपानने 'इंडियानापोलीस' ही क्रूझर बुडविली.) तसेच तीन स्वतंत्र विमानांतूनही यू–२३५ लिनियनला पाठविण्यात आले. एकाच वेळी सर्व यू–२३५ लावून देण्याचा धोका पत्करण्यास ते तयार नव्हते.

५ ऑगस्टच्या मध्यरात्री, ही मोहीम यशस्वी व्हावी म्हणून प्रार्थना म्हणण्यात आली. या सात विमानांच्या पायलट्सनी नाश्ता वगैरे केला. रात्री १·३७ ला. हिरोशिमा, कोकुरा, नागासाकी येथील हवेची तपासणी घेण्यासाठी तीन विमानांनी उड्डाण केले. हिरोशिमावर जर ढग अथवा धुके असेल तर बाकीची दोन शहरे लक्ष्ये होणार होती.

६ ऑगस्ट. पहाटे २–४५ ला टिबेट्सच्या 'एनोला गे' या विमानाने आकाशात झेप घेतली. दोनच मिनिटांनी आणखी दोन बी–२९ विमानांनी त्याचे अनुकरण केले. त्यांतील एक स्फोट व किरणोत्सर्गाच्या मोजणीसाठी व दुसरे छायाचित्रणासाठी होते. 'एनोला गे' मध्ये काही अडचण उत्पन्न झालीच तर इवोजिमा येथे अणुबॉंब ज्या दुसऱ्या विमानात ठेवायचा होता त्या विमानाने केव्हाच उड्डाण केले होते.

पहाटे ४–५५ ला एनोला गे इवोजिमा येथे (लिनियनपासून ६२२ मैल) आले. पण या विमानात काहीच अडचण उत्पन्न झालेली नसल्याने बॉंबच्या हलवाहलवीचा काहीच प्रश्न नव्हता. थोड्या वेळाने तिन्ही विमानांनी परत उड्डाण केले व रुंद 'V' च्या आकारात राहून ते जपानकडे झेपावले.

हिरोशिमातील नागरिकांच्या दृष्टीने पूर्वीच्या मवारमध्ये व ६ ऑगस्ट १९४५ च्या सोमवारमध्ये काहीच फरक नव्हता. आपल्या नेहमीच्या कामात गुंतलेले असल्याने लोकांनी सकाळच्या ७·०९ च्या हवाई हल्ल्याच्या भोंग्याकडे फारसे लक्ष दिले नाही. काही लोकांनी वर पाहिले असता अगदी उंचावर त्यांना एक बी–२९ विमान दिसले. बऱ्याच वेळी सकाळी येणारे हवा चाचणीचे विमान असावे

असा काहींनी तर्क केला. या विमानाने शहरावर दोन चकरा मारल्या व ७-२५ ला ते समुद्राकडे वळले. ७-३१ ला आलबेलचा भोंगा झाला.

स्पेशल बॉंबिग मिशन नं. १३ ने हिरोशिमावरील हवा चाचणी करण्यासाठी सोडलेले विमान होते ते. विमानाचे नाव होते 'स्ट्रेट फ्लश.' हे जपानवर आले तेव्हा सर्व जपान ढगात व धुक्यात बुडाले होते. तथापि काही मिनिटांतच सर्व हिरोशिमा स्वच्छ दिसू लागले. 'एनोला गे' ज्या ठिकाणी बॉंब टाकणार होते तेथे तर आकाश इतके स्वच्छ होते की खालच्या हिरव्यागार शेतांचे पट्टे स्वच्छ दिसत होते. सर्व जपानवर धुके, ढग असताना हिरोशिमाचा १० मैलांचा परिसर मात्र दुर्दैवाने अगदी निरभ्र होता. हृदयात मारलेल्या एखाद्या खिळ्याप्रमाणे हा परिसर दिसत होता.

७-२५ ला स्ट्रेट फ्लशने संदेश पाठविला, 'आकाश स्वच्छ. बॉंब तयार ठेवा.' लवकरच टिबेट्सने इंटरकॉमवरून सर्वांना सांगितले, 'यापुढे प्रत्येकाने आपापल्याच जागी असले पाहिजे. आपण जपानच्या किनाऱ्यावर आल्यावर आपले बोलणे टेपरेकॉर्ड केले जाईल. आपण इतिहास घडविणार आहोत. तेव्हा आपल्या भाषेची काळजी घ्या. जगातील पहिला अणुबॉंब नेण्याचे श्रेय आपल्याला मिळत आहे.' वैमानिक सोडून बाकीचे बरेच लोक 'अणूबॉंब' हा शब्द प्रथमच ऐकत होते.

७-५० ला 'एनोला गे' जपानच्या शिकोकू बेटावर आले. सर्व लोकांनी आपली आयुधे सज्ज केली. बॉंबची सर्व इलेक्ट्रॉनिक रचना तपासली. ती सुरळीत होती. जपानला काहीच संशय आलेला नसल्याने त्यांचा पाठलाग होत नव्हता. ८-०० ला हिरोशिमाच्या सीमेवर सर्वजण आले. टिबेटस्‌ने सहकाऱ्यांना सांगितले, 'पुढील सूचना मिळाल्याबरोबर प्रत्येकाने आपला गॉगल लावावा. स्फोट होऊन आगीचा लोळ उठून जाईपर्यंत कुणीही गॉगल काढता कामा नये.' फक्त जांभळ्या रंगाचे किरणच जाऊ शकतील असे खास तयार केलेले गॉगल्स प्रत्येकाला दिलेले होते.

३१,६०० फुटांवरून 'एनोला गे' चालले होते. त्याखाली दीनदुबळे हिरोशिमा उघडे पडले होते. अणुबॉंब टाकणाऱ्या मे. थॉमस फेरबींना खाली ओळखीच्या खाणाखुणा दिसू लागल्या. डोक्यात पूर्ण भिनेपर्यंत या भागाचे फोटो त्यांनी हजारदा पाहिले होते. ओटा नदीच्या मुख्य पुलाचा मध्य हे बॉंबचे लक्ष्य होते. खाली केसाएवढी ती नदी दिसत होती.

'आय गॉट इट' फेरबी ओरडले. बॉंब टाकण्यासाठी त्यांच्या हालचाली यंत्रवत सुरू झाल्या. ४५ सेकंदांनंतर त्यांनी खुणांचा संदेश दिला. आता केवळ १५ सेकंदांनीच तो राक्षस मुक्त होणार होता.

बरोबर ८ वाजून १५ मिनिटे १७ सेकंदांनी बॉंब ठेवलेल्या जागेचे खालचे दरवाजे खाडकन् उघडले गेले. १०,००० पौंडांनी हलके झाल्याने 'एनोला गे' एकदम वर गेले. तत्काळ टिबेट्सने ६०° ने विमान वळविले. बॉंब कॅरन टेल गनर होता.

त्याने काय पाहिले ते नंतर सगळ्यांना सांगण्यास सांगून टिबेट्सने मनातल्या मनात ४३ सेकंद मोजायला सुरुवात केली. हे ४३ सेकंदसुद्धा कसे ४३ युगासारखे वाटत होते.

बाँबच्या इलेक्ट्रॉनिक सर्किटची सूचना देणाऱ्या यंत्राची जबाबदारी ले. मॉरिस जेपसन्कडे होती. त्याने ४३ सेकंद मोजायला सुरुवात केली. आता शेवट आला होता. ४०...४१...४२...त्याने मोजणी थांबवली.

७–३१ ला झालेल्या आलबेलच्या भोंग्याने हिरोशिमाच्या गतीत काहीच फरक पडला नाही. कारण कुणाचे हवाई हल्ल्याच्या पहिल्या इशाऱ्याकडेही लक्ष नव्हते. ८–१५ ला काहींचे लक्ष वर गेले. V आकारात येणारी तीन विमाने त्यांना दिसली. यातील एकातून तीन हवाई छत्र्या बाहेर पडल्या. स्फोट व किरणोत्सर्ग मोजण्यासाठी आलेल्या विमानातून या छत्र्या सोडल्या होत्या. मापनाची उपकरणे त्यांना लावली होती. कित्येकांना वाटले या विमानात बिघाड झाल्याने वैमानिक व त्याच्या सहकाऱ्यांनी विमानातून उड्या मारल्या आहेत. आनंदाने ते टाळ्या पिटू लागले. त्यांचा आनंद ३/४ मिनिटेच टिकला. तोपर्यंत शहरावर फक्त तीन हवाई छत्र्याच आकाशात तरंगताना दिसत होत्या आणि एकदम आकाशाचे हेच छप्पर उडून गेले.

त्याचक्षणी कॅरनच्या डोळ्यापुढे सर्व जग जांभळ्या दैदिप्यमान तेजाने उजळून निघाले. गॉगलमधूनसुद्धा त्याला ते तेज पाहवले नाही. त्याचे डोळे आपोआप झाकले गेले. 'मी आंधळा झालो की काय?' त्याला उगीच वाटले. त्याने जे पाहिले त्यामुळे तो इतका स्तंभित झाला होता की इंटरकॉमवरून सर्वांना त्याचे वर्णन सांगण्याचे तो प्रथम विसरलाच.

इतक्या क्षणार्धात हा स्फोट घडला की कोणत्याच घड्याळाने तो मोजला गेला नसता. त्या तेजोगोलाच्या मध्यभागी तपमान होते १,००० लक्ष डिग्री. हिरोशिमा आता एक मृत शहर होते.

स्फोटानंतर साधारणपणे एक मिनिटाने विमानाला जोरदार धक्का बसण्याची शक्यता आहे अशी सूचना त्यांना दिली होती. तेव्हा त्यातून बचावण्याकरिता, जास्त उंची मिळविण्यासाठी व वेग कमी करण्यासाठी त्यांनी विमानाचे नाक (पुढील भाग) वर केले. यामुळे धक्का कमी बसला असता.

लिकलिक प्रकाशत विमानाकडे येणारी एक लाट मागच्या टरेटमधून कॅरनला दिसली. विमानातून खालच्या डांबरी रस्त्यावर नेहमी दिसणाऱ्या उष्णता लहरीसारखी ती दिसत होती. पाण्यात दगड टाकल्यावर लहरी पसरत जाव्यात त्याप्रमाणे ती लाट मोठी-मोठी होत जात होती. बाँबस्फोटानंतर जास्त दाबाच्या हवेच्या पाठोपाठ निर्वात प्रदेश निर्माण झाला. या निर्वात प्रदेशात हवा सांद्रीभूत होत होती. त्यामुळे ही लाट मोठी होत दिसत होती. धुक्याच्या पट्ट्यासारखी दिसणारी ही लाट मिनिटाला १२ मैल या वेगाने विमानाचा पाठलाग करीत होती. विमानापासून वीसच फुटांवर तोफेचा गोळा फुटावा त्याप्रमाणे या लाटेमुळे विमा-

नाला दोन धक्के बसले. आता सर्व संकटे संपली होती. विमानांच्या या त्रिकुटाने परतीचा प्रवास सुरू केला. आपण काय केले ते आता त्यांना दिसले.

धुळीचे व आगीचे लोट सर्व शहरभर उठले होते. इमारती जमीनदोस्त झाल्या होत्या. पांढऱ्या धुराचा एक स्तंभ छत्रीचा आकार घेत सरळ आकाशात गेला. सर्व हिरोशिमा नष्ट झाले होते. वैमानिकांच्या मनात भावनांचे कल्लोळ उठले. अणु-बाँबचा स्फोट यशस्वी झाल्याने आता युद्धाचा शेवट होणार हे जवळ-जवळ निश्चित होते. त्यामुळे काहींना आनंद झाला. काहींना अभिमानाबरोबरच दुःखाने काजळले. आपण जे पाहिले ते सत्य आहे यावरच बऱ्याच जणांचा विश्वास बसेना. टिबेट्सचा सहकारी कॅ. रॉबर्ट लुई ओरडला, " अरे देवा, काय केलं आपण हे ! "

' बरोबर लक्ष्यावरच बाँब टाकला. शत्रूच्या विमानांशी कुठेही लढाई झाली नाही. स्फोट सर्व दृष्टीने यशस्वी. न्यूमेक्सिकोतील चाचणीपेक्षा फार संहारक परिणाम. ' असा संदेश तिनियनकडे व तेथून अमेरिकेत पाठविला गेला.

' एनोला गे ' लिनियनच्या तळावर उतरल्याबरोबर २०० अधिकारी व सैनिकांनी विमानाला गराडा घातला. टिबेट्स् विमानातून उतरल्याबरोबर जनरल स्पाट्झ्नी त्याच्या छातीवर विशिष्ट सेवापदक लावले. पुरेशी झोप न मिळाल्याने टिबेट्स्चे डोळे लाल झाले होते. तो एकदम गोंधळला. स्पाट्झ्नी त्याच्याशी हस्तांदोलन केले. लोकांनी सर्वांचा जयजयकार केला. या मिशनमध्ये भाग घेतलेल्या सर्वांना नंतर पदके बहाल करण्यात आली.

जे या स्फोटातून वाचले त्यांना आठवते की स्फोटाच्या क्षणी होता फक्त प्रकाश-डोळे दिपवणारा, तीव्र, जाळणारा तरीही मोहक. एकाला आठवते की प्रथम पांढरा असणारा हा प्रकाश नंतर गुलाबी झाला. सगळीकडे पसरत जाताना तो निळा जांभळा होत गेला. काहींना पाच-सहा तीव्र रंग दिसले. काहींना फोटोग्राफीचा प्रचंड फ्लॅशबल्ब चमकून गेल्यासारखे वाटले. हा फक्त देखीव ठसा होता. फारसा आवाज झालाच नाही व झालाच असला तर तो कुणालाच ऐकू आला नाही.

हजारोंना काहीच दिसलं नाही. काही समजण्याच्या आत हिरोशिमात निर्माण झालेल्या त्या राक्षसी शेगडीत त्यांची राख झाली. या पाठोपाठ वादळ झाले. खिडक्यांच्या काचा फुटून सुदर्शन चक्रासारख्या उडू लागल्या. पत्त्याच्या बंगल्यासारखी घरे कोसळू लागली. या सर्वांत मिळून आणखी काही हजार मेले. स्फोटाच्या पहिल्या क्षणी ७०,००० लोकांचा कोळसा झाला. एकंदर २ लाख माणसांची या पहिल्या यज्ञात आहुती पडली.

सुरुवातीच्या दैदिप्यमान प्रकाशानंतर, हिरोशिमावर संकटांवर संकटांच्या धाडी कोसळल्या. प्रथम निर्माण झाली तीव्र उष्णता. ती काही क्षणच टिकली. पण ती इतकी तीव्र होती की कौले वितळली. ग्रानाईटच्या दगडातील काचांचे स्फटिक

वितळले. दोन मैलांपर्यंतच्या सर्व प्रकारच्या खांबांचा कोळसा झाला. एकही हिरवे झाड शिल्लक राहिले नाही. जवळपासची मानवजात इतक्या पूर्णपणे नष्ट झाली की भिंतीवरील अथवा जमिनीवरील त्यांच्या सावल्यांच्या पलीकडे काहीही शिल्लक राहिले नाही. हिरोशिमाच्या १० मैलांच्या परिसरांतील ४ मैलांचा भाग क्षणात अंतर्धान पावला. पांढऱ्या कागदावरील फक्त सर्व काळी अक्षरे जळून गेली. हजारो स्त्रियांच्या अंगावरील कपडयांचे गडद रंगाचे भाग जळून गेले. पण फिकट छटांच्या भागांना काहीच झाले नाही. स्त्रियांच्या किमोनोवरील फुलांची डिझाईन्स त्यांच्या त्वचेवर गोंदली गेली.

यातून लोक सावरतात न सावरतात तोवर ताशी ५०० मैल वेगाने वादळ झाले. एवढचा वेगापुढे काय टिकू शकणार ? पुलांचे कठडे, पाईप, काही खांब यांचा पृष्ठभाग लहान असल्याने त्यांनी किमान प्रतिकार केला. त्यामुळे एवढचाच गोष्टी कशाबशा टिकू शकल्या. वादळ व आगीने ५ मैलांच्या परिसरांतील एकूण एक घरे नष्ट केली. भूकंपाला तोंड देण्यासाठी काही ऑफिसे खास प्रकारांनी बांधली होती, तीच तेवढी शिल्लक राहिली. पण त्यांच्या अंतर्भागात केवळ मोडतोड शिल्लक होती.

स्फोटानंतर काही मिनिटांनी मोठा विचित्र पाऊस पडू लागला. त्याचे थेंब गोटीएवढे मोठे होते व ते काळे होते. प्रचंड उष्णतेमुळे हिरोशिमाच्या परिसरातील पाण्याची चटकन् वाफ होऊन ती वर गेली व थंड होऊन पाऊस पडू लागला. लागलेल्या आगी थांबविण्यास हा काळा पाऊस पुरेसा नव्हता. उलट लोकांच्या हालात त्याने अधिकच भर घातली. कारण या पावसामुळे किरणोत्सर्गाचा परिणाम नागरिकांच्यावर झाला.

पावसानंतर पुन्हा वारा सुटला. आगीमुळे निर्माण झालेला वारा बाँबच्या लक्ष्याच्या जागेकडे प्रसरू लागला. हिरोशिमांत पसरलेल्या आगींच्यामुळे तेथील हवा तापू लागली. त्यामुळे वाऱ्याचा वेग क्षणोक्षणी वाढू लागला. आगी व पडझडीपासून वचवण्याकरिता लोक बागातून जमायला लागले होते. या वाऱ्यामुळे बागेत उरलेले उरले-सुरले वृक्ष उन्मळून पडू लागले. उष्णता व आगीने तगमगून कित्येक लोक पाण्यात शिरले होते. या माऱ्यामुळे नदी, सरोवरे यात अेवढचा प्रचंड लाटा उठल्या की त्यातील कित्येक लोक बुडून मेले.

अणूशास्त्रज्ञांच्या कल्पनेपेक्षा फार मोठ्या प्रमाणांत हा संहार झाला होता. येथे अनेक कारणे एकत्र आली होती. पहिले व अत्यंत महत्वाचे कारण होते अणूबाँबचे अचूक लक्ष्यावर पडणे. नेमून दिलेल्या लक्ष्यापासून फक्त २०० यार्डानी मे. फेरबींचा नेम चुकला होता. दुसरे म्हणजे स्फोटाची वेळ. सर्व हिरोशिमावर यावेळी नाष्टा तयार करण्यासाठी हजारो शेगडचा फुललेल्या होत्या. स्फोटानंतर झालेल्या वादळाने प्रत्येक शेगडी उलथून पडली. या मशालीमुळे, कागद व लाकडापासून बनवलेली ती घरे कापरासारखी जळून गेली. तिसरे कारण हवाई हल्ल्याचा इशारा.

ओपनहेमरला वाटले होते की विमाने हिरोशिमावर आल्याबरोबर हवाई हल्ल्याचा इशारा होईल व त्याबरोबर बरेच लोक सुरक्षित स्थळांचा आसरा घेतील व त्यामुळे फक्त २०,००० बळी मिळतील. पण प्रत्यक्षांत असा इशारा झालाच नाही. त्यामुळे लोकांना हल्ल्याची कल्पना देखील आली नाही. बरेच लोक आपापल्या कामाकडे चालले होते. त्यामुळे बाँबस्फोटाच्या पहिल्या क्षणीं ७०,००० लोक जळून मेले.

८.१६ नंतर क्षणार्धांत.हिरोशिमा रेडिओ स्टेशनबरोबरचे, टेलीफोनचे दळणवळण बंद पडले आहे असे जपान ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशनच्या टोकीयो कंट्रोल ऑपरेटरला आढळून आले. त्याचे दळणवळण पुन्हा चालू करण्याचा बराच प्रयत्न केला पण हिरोशिमाला कॉल मिळत नाही असे त्याला आढळून आले.

८.४० मुख्य टेलीग्राफ लाइन काम देत नाही असे टोकीयो रेल्वे स्टेशनच्या मुख्य सिग्नल विभागास आढळून आले. हिरोशिमाच्या ज्या उत्तरेस काहीतरी घोटाळा झाला असावा असा त्यांचा अंदाज होता. हिरोशिमाला कसलातरी स्फोट झाला असावा असे संदेश आजूबाजूच्या स्टेशनवरून येऊ लागले. अमेरिकन विमानांनी टाललेल्या बाँबमुळे सर्व हिरोशिमा शहर नष्ट झाले आहे अशी बातमी "आसाहि" या टोकीयोतील वृत्तपत्रास १० वाजता समजली.

टोकीयो जनरल हेडक्वार्टरने हिरोशिमाशी दळणवळण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ. ओसाका जनरल हेडक्वार्टरकडून त्यांना अशीच बातमी मिळाली. १ च्या सुमारास II आर्मी कोअरकडून टोकीयो जनरल हेडक्वार्टरला संदेश आला. संदेश लहानच पण फार धक्कादायक होता. " एका बाँबने सर्व हिरोशिमा नष्ट झाले आहे. सर्वत्र आगी पसरल्या आहेत. हिरोशिमाच्या समुद्रातील एका नाविक केंद्राने ही बातमी सर्वप्रथम दिली होती. स्फोटाच्या जागेपासून हे केंद्र बरेच दूर असल्याने बचावले होते.

आजूबाजूहून बातम्या येतच होत्या. दुपारी टोकीयो जनरल हेडक्वार्टरला समजले की स्फोटाच्या वेळी फक्त तीनच अमेरिकन विमाने शहरावर होती. त्यातील दोघांनी कसलीही बाँबफेक केली नाही व तिसऱ्या विमानातून फक्त एकच बाँब टाकण्यात आला.

टोकीयोंतील ५ प्रमुख वृत्तपत्रांच्या संपादकांना जपानच्या माहिती व गुप्तचर खात्याने संध्याकाळी बोलावून घेतले. लष्कराच्या एका प्रसिद्धी अधिकाऱ्याने त्यांना माहिती दिली. " हिरोशिमावर टाकलेला बाँब नेहमीच्या बाँबपेक्षा वेगळा होता अशी आमची खात्री आहे. पूर्ण माहिती मिळाल्यावरच त्याविषयी आम्ही योग्य ती घोषणा करू. जोपर्यंत तुमच्या वृत्तपत्रांच्या कुठल्यातरी कोपऱ्यात ही बातमी टाका. नेहमीच्या हवाई हल्ल्याच्या बातमीपेक्षा त्यात फरक असता कामा नये.

तो अणूबाँबच होता असा लष्कराला संशय होता. पण जपानच्या भूमीवर अमेरिकेशी शेवटची हातघाईची लढाई देण्यासाठी, हे युद्ध पुढे रेटण्यासाठी लष्कर

उत्सुक होतें. त्यासाठी ही बातमी नागरिकांना समजून न देणे आवश्यक होते. तेव्हा सर्वांची तोंडे बंद करून सत्य झाकून ठेवण्याचे त्यांनी ठरविले.

पण कोंबडं झाकून सूर्य उगवायचा राहाणार नव्हता. हे सत्य असे लपून राहणार नव्हते. टोकीयोच्या उत्तरेस सैतामा येथे "डोमी" या निम्मसरकारी वृत्तसंस्थेचे ऑफिस होते. येथील ५० नोकरात अमेरिकेत जन्मलेल्या बऱ्याच निसी मुली होत्या. त्या अमेरिकन बातम्या नेहमी ऐकत. हिरोशिमावर टाकलेला बॉंब अणूबॉंब होता हे अध्यक्ष ट्रूमनने जाहीर केले असे त्यांनी बातम्यावर ऐकले. लगेच त्यांनी ही बातमी लगेच आपले मुख्य हैडो किनोशिरा यांना सांगितली.

किनोशिरा यांनी ही बातमी ताबडतोब पंतप्रधान सुझुकी यांना कळविली. सुझुकी सुन्न झाले. शेवटी ते म्हणाले, "हे जर सत्य असेल तर कुठलाच देश युद्ध चालू ठेवू शकणार नाही......युद्ध थांबविण्याची हीच वेळ आहे. आता युद्ध हरल्याबद्दल आम्हाला, सैन्याला अथवा शस्त्रास्त्रे तयार करणाऱ्या कारखान्यांना कोणी दोषी ठरवू शकणार नाही. सर्व अणूबॉंबवर झटकून आम्हास मोकळे होता येईल. आता युद्ध थांबविण्यासाठी ही अणूबॉंबची सबब चांगली आहे."

पण ह्या दृष्टीकोन स्वीकारण्याची लष्कराची तयारी नव्हती. ७ ऑगस्टला मंत्रि-मंडळाची तांतडीची बैठक झाली. त्यावेळी, ह्या अणुबॉंब नसून नेहमीच्याच प्रकारातील फक्त प्रचंड बॉंब होता, असा युक्तिवाद सेनाधिकाऱ्यांनी केला. पॉट्स्डॅम इशाऱ्याच्या अटीवर संपूर्ण शरणागति पत्करावी या परराष्ट्र मंत्री टोगोंच्या सूचनेवर लगेच विचार करण्यास त्यांनी स्पष्ट नकार दिला, हिरोशिमा येथे प्रत्यक्ष पहाणी व चौकशी करेपर्यंत अध्यक्ष ट्रुमन यांचे विधान नागरिकांच्यापासून लपवून ठेवण्यावरच त्यांनी भर दिला. सेनाधिकाऱ्यांची लढाईची खुमखुमी अजून गेली नव्हती.

अणुबॉंबच्या हल्ल्याचे वृत्त ताबडतोब सर्व नागरिकांना कळविण्यास वॉशिंग्टनने संमती दिली. एवढ्या महत्त्वाच्या बातमीची माहिती मिळविण्यासाठी वार्ताहारांची धामधूम सुरू झाली. या बॉंबचे अधिकृत वृत्त जाहीर झाल्यावर सर्व जग हादरले. व्हाईट हाऊसमधून निघालेल्या पहिल्या अधिकृत पत्रकांत अणुबॉंबची त्याच्या शक्तिची व परिणामांची थोडक्यात माहिती देऊन ते पत्रक म्हणते, "जपानच्या नागरिकांचा सर्व नाश टाळण्यासाठीच २६ जुलैला पॉट्स्डॅम येथून निर्वाणीचा इशारा देण्यात आला होता. पण दुर्दैवाने जपानच्या नेत्यांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. मात्र आता जर त्यांनी आमच्या अटी मानल्या नाहीत तर आतापर्यंत त्यांनी कधीही अनुभवला नसेल असा नाश, संकटे ते टाळू शकणार नाहीत."

राजे हिरोहीटोच्या शरणागतीस वेग यावा म्हणून अमेरिकेने जोरदार प्रचार मोहीम उघडली. जपानच्या ४५ शहरांवर १६० लक्ष पत्रके टाकण्यात आली.

हिरोशिमावरील बॉंब ही निसर्गाची केवळ एक लहर नव्हती हे जपानी पुढाऱ्यांना पटविण्यासाठी आणखी एक, दोन अणुबॉंब लगेच टाकले पाहिजेत असे ठरवून वॉशिंग्टनने दुसऱ्या अणूबॉंबची तयारी सुरू केली.

दुसऱ्या बाँबफेकीत पहिल्यापासून अडथळे येत गेले. सुरुवातीपासून शेवटपर्यंत एकही गोष्ट सरळ पार पडली नाही. न्यूमेक्सिकोतील चांचणीप्रमाणे हा बाँब प्लुटोनियमचा होता. (हिरोशिमावर टाकलेला बाँब, तोपर्यंत कधीही चांचणी न घेतलेल्या प्रकाराचा—युरेनियमचा होता.) या बाँबचे पहिले लक्ष कोकुरा होते. पण कोकुरावर ढगांचा एवढा थर होता की तीन चकरा मारल्या तरी एवढीही मोकळी जागा सापडू शकली नाही, त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे लक्ष्य असलेल्या नागासाकीकडे विमाने वळली. नागासाकीवरही ढगांचे पांघरूण होते. त्यामुळे बाँब फेकीत रडारचे सहाय्य घेण्यात आले. मुख्य लक्ष्य तीन मैलांनी चुकले पण नाश काही कमी झाला नव्हता.

अशा तऱ्हेने ९ ऑगस्ट १९४५ ला नागासाकीवर अणुबाँब टाकण्यात आला. त्या दिवशी रेडिओवर केलेल्या भाषणांत अध्यक्ष ट्रुमन म्हणाले, " अणुबाँबने निर्माण केलेल्या दुःखदायक समस्यांची आम्हास जाणीव आहे. आमचे शत्रू याच अस्त्राच्या शोधांत होते. त्यांच्या हाती हे अस्त्र लागले असते तर शांततावादी राष्ट्राची काय दशा झाली असती याची कल्पनाच केलेली बरी. ही जाणीव आम्हास होती, म्हणूनच आम्ही अणुबाँबच्या निर्मितीचा ध्यास घेतला होता. सुदैवाने सर्वांच्या आधी आम्हास त्यात यश आले, सर्व आंतरराष्ट्रीय युद्धनियम धाब्यावर बसवून, कसलाही इशारा न देता ज्यांनी आमच्या पर्ल हार्बरवर निर्घृण हल्ला केला होता त्यांच्याविरुद्धच आम्ही हा अणुबाँब वापरला आहे. युद्धाची अखेर लवकर व्हावी व आमच्या हजारो तरुणांचे प्राण वाचावेत म्हणूनच आम्ही हे शस्त्र वापरले आहे. आता जपानने संपूर्ण शरणागती पत्करल्याशिवाय आम्ही थांबणार नाही...

आताच युद्ध थांबवले नाही तर सर्वनाश अटळ आहे याची जपानला जाणीव झाली. " राजे हिरोहिटोच अधिपती राहतील असे गृहीत धरून आम्ही पॉट्सडॅमच्या इशाऱ्याप्रमाणे बिनशर्त शरणागती पत्करण्यास तयार आहोत. " असा संदेश जपानने स्वित्झरलंडमार्फत पाठविला.

१० ऑगस्ट १९४५ च्या संध्याकाळी जपानने संपूर्ण शरणागती पत्करली व बरीच वर्षे रेंगाळलेल्या या युद्धाची अखेर झाली.

युद्धाचा शेवट जवळ आणण्यात अणुबाँबचा सिंहाचा वाटा होता हे नाकारण्यात काहीच अर्थ नाही. अण्वस्त्रांच्या वापरामुळे परंपरागत युद्धशास्त्राचा मुखवटाच बदलला आहे. आता सैनिकी युद्धांना काहीच अर्थ उरलेला नाही. दुसऱ्या महायुद्धाचा शेवट अणुबाँबने झाला, पण आता तिसऱ्या महायुद्धाची सुरवातच अणुबाँबने होणार आहे. मग या जगाचा समूळ संहार टाळणे ब्रह्मदेवालाही शक्य होणार नाही. ही जाणीव असल्यामुळेच तिसऱ्या महायुद्धाच्या कडेवर येऊनही अजून तोल गेलेला नाही. अण्वस्त्रांची संहार शक्तीच आता मानवाचा संहार टाळीत आहे हे आपले सुदैव.

## समाप्त

निवडणूक मतप्रवाह :

# आदिवासींचा कल

**वा. दा. रानडे**

लोकसभेत आदिवासींसाठी ३७ जागा आहेत. हुकमी बहुमत मिळण्याचे दृष्टीने या ३७ जागांचा निकाल निर्णायक ठरण्याचा संभव आहे. आदिवासींचा पाठिंबा कोणत्या पक्षाला आहे ? गेल्या निवडणुकीतील आदिवासींच्या मतदानाचे या दृष्टीने विश्लषण करणे उद्‌बोधक ठरेल.

आदिवासींसाठी असलेल्या एकूण ३७ जागांपैकी काँग्रेसने २४ म्हणजे दोन तृतीयांश जागा जिकल्या. इतर पक्षांना मिळालेल्या १३ जागांमध्ये स्वतंत्र पक्ष ५, जनसंघ २, बंगलाकाँग्रेस १, डोंगरी नेते परिषद १ आणि अपक्ष ४ अशी विभागणी झाली. महाराष्ट्र व गुजरातमध्ये सर्वच्या सर्व तीन जागा काँग्रेसने मिळविल्या. बिहारमध्ये ५ पैकी ४, मध्यप्रदेशात ८ पैकी ५, राजस्थानात ३ पैकी २, आंध्रमध्ये २ पैकी १, आसाममध्ये २ पैकी १, ओरिसात ५ पैकी २, पश्चिम बंगालमध्ये २ पैकी १ आणि केंद्रप्रदेशात ४ पैकी २ असे इतर राज्यातील काँग्रेसचे यश होते. आदिवासींचे मतदारसंघ असलेल्या सर्व राज्यात काँग्रेसला कमी अधिक जागा मिळालेल्या आहेत. हरियाना, काश्मीर, तामिळनाडू, म्हैसूर, पजाब, उत्तर-प्रदेश व केरळमध्ये आदिवासींसाठी जागाच नाहीत.

आदिवासींच्या एकूण ३७ जागांपैकी काँग्रेसने २४ म्हणजे जवळजवळ दोन तृतीयांश, जागा जिकल्या खऱ्या पण जिकलेल्या जागांपैकीं निम्म्या म्हणजे बारा मतदार संघात विजयी काँग्रेस उमेदवारांना ५० टक्क्यापेक्षा कमी मते मिळालेली आहेत. म्हणजेच विरोधी उमेदवारांची एकूण मते काँग्रेसच्या मतांपेक्षा जास्त आहेत. ती विभागली न जाता एकवटली असती तर या जागा काँग्रेसला मिळाल्या नसत्या. या मतदारसंघात विरोधी पक्षांनी यावेळी शक्ती एकवटणे त्यांच्या फायद्याचे ठरेल.

महाराष्ट्रात डहाणू, मालेगाव व नंदुरबार हे आदिवासी मतदारसंघ आहेत. या तीनपैकी डहाणूची जागा काँग्रेसचे श्री. वाय्, एम. मुकणे यांनी ४७.४६ टक्के म्हणजे पन्नास टक्क्यापेक्षा कमी मतांनी जिंकली. मुकणे यावेळी संघटना काँग्रेसतर्फे उभे रहात आहेत,

सरळ सामन्यात काँग्रेसला विजय मिळविणे कठीण जाते हा अनुभव सर्व-साधारण व हरिजन मतदारसंघांप्रमाणे आदिवासी जागांच्या बाबतीतही गेल्या

निवडणुकीत आला. सरळ सामने अकरा जागांसाठी झाले. त्यापैकी सहा काँग्रेसने व पाच विरोधी पक्षांनी जिंकल्या. म्हणजे एकूण जागांमध्ये काँग्रेसला दोन तृतीयांश व विरोधी पक्ष आणि अपक्ष यांना एक तृतीयांश असे प्रमाण असता सरळ सामन्यात याच विरोधी पक्षांनी काँग्रेसच्या जवळजवळ बरोबरीने जागा मिळविल्या. महाराष्ट्रात सरळ सामन्यात मालेगाव व नंदुरबारच्या जागा काँग्रेसने जिंकल्या. मालेगावमध्ये काँग्रेस विरुद्ध रिपब्लिकन पक्ष आणि नंदुरबारमध्ये काँग्रेस विरुद्ध जनसंघ अशी लढत झाली होती. मालेगावची जागा काँग्रेसने फक्त दहा हजार मतांनी जिंकली. नंदुरबारची जागा मात्र जवळजवळ चाळीस हजार मतांनी जिंकली. मालेगावमध्ये यावेळीही सरळ लढत झाली तर तेथील निवडणूक चुरशीची होईल. सरळ सामन्यात विरोधी पक्षांनी जिंकलेल्या पाच जागांपेकी तीन स्वतंत्र पक्षाला, एक जनसंघाला व एक बंगला काँग्रेसला मिळाली.

पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतांनी विजयी झालेल्या एकूण १८ उमेदवारात १२ काँग्रेसचे व ६ इतर आहेत. विजयी सहा इतर उमेदवारांमध्ये जनसंघाचे दोन व अपक्ष चौघे आहेत.

काँग्रेसने आसाममधील एक जागा बिनविरोध जिंकली. अकरा जागा पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळवून जिंकल्या. त्यात गुजरात २, महाराष्ट्र २, राजस्थान २, आंध्र १, मध्यप्रदेश १, ओरिसा १, व केंद्रशासित प्रदेश २, अशी विभागणी होती. विरोधी पक्षांना एकही जागा बिनविरोध मिळाली नाही. त्यांचे सहा उमेदवार पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळवून निवडून आले. त्यात पाच स्वतंत्र पक्षाचे व एक बंगला काँग्रेसचा होता.

आदिवासी मतदार संघाच्या निकालात गेल्या वेळी आढळून आलेला एक महत्त्वाचा विशेष : डाव्या पक्षांना एकही जागा मिळाली नाही. वास्तविक डावे पक्ष आदिवासींचे कैवारी. आदिवासींसाठी भूमिहीनांचे आंदोलनासारख्या चळवळी त्यांनी केल्या पण आदिवासींनी त्यांच्या एकाही उमेदवारास निवडून दिले नाही. विरोधी पक्षांमध्ये स्वतंत्र पक्षाने ५ व जनसंघाने २ जागा जिंकल्या व चार अपक्ष उमेदवार निवडून आले. आदिवासींवर प्रभाव पाडण्यात डाव्या पक्षांना अजून यश आलेले नाही असाच याचा अर्थ आहे.

आपल्या मताच्या हक्काबद्दल आदिवासी कितपत जागरूक आहेत ? आदिवासी मतदारसंघात एकूण मतदान ४८·९६ टक्के झाले. म्हणजे बहुसंख्य मतदारांनी मतदानात भाग घेतला नाही. राज्यवार विचार केला तर केंद्रशासित लखदीव मिनिकॉय व अमीनदिवी बेटांच्या मतदारसंघात सर्वात जास्त ८२·०२ टक्के मतदान झालेले आहे. सबंध देशातही तो उच्चांक आहे. त्या खालोखाल दाद्रा-नगर-हवेली ७८·२८ टक्के आणि त्रिपुरा ७४·१८ टक्के असे मतदान आहे. यावरून आदिवासींच्या मतदारसंघात तीन केंद्रशासीत मतदारसंघांनीच अग्रक्रम मिळविल्याचे दिसते. चौथा केंद्रशासीत आदिवासी मतदारसंघ त्रिपुरामध्ये ५४·६६ टक्के मतदान झाले. निरनिराळ्या राज्यातील आदिवासी मतदारसंघांच्या मत-

दानात सर्वात जास्त ६१·६२ टक्के मतदान पश्चिम बंगालमध्ये व त्याखालोखाल ६०·९५ टक्के गुजरातमध्ये होते. राजस्थानात ते ५९·८६ आणि महाराष्ट्रात ५९·०५ टक्के झाले. महाराष्ट्राचा क्रमांक चौथा आहे. आंध्रमध्ये ५७·४४ टक्के व आसाममध्ये ५१·४० टक्के मतदान झाले. पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान बिहार, मध्यप्रदेश व ओरिसा या राज्यात झाले. तेथील आदिवासी मतदार-संघातील मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे : बिहार ३५·०५, मध्यप्रदेश ४६·९४ आणि ओरिसा ३२·६१. आदिवासींमधील मतांच्या हक्कांबद्दलचे जागरूकतेचे दृष्टीने बिहार व ओरिसा सर्वात मागासलेले आहेत.

मताच्या हक्काबद्दल नुसती जागरूकता पुरेशी नाही. मते बाद व्हायला नको असतील तर मतदान कसे करावयाचे याची बरोबर माहितीही मतदारास हवी. आदिवासी त्या दृष्टीने अजून मागासलेले आहेत असे १९६७ च्या लोकसभा निवडणुकीतील बाद मतांच्या आकड्यांवरून दिसते. सबंध देशात ४·६८ टक्के मते बाद झाली पण आदिवासी मतदारसंघात हे प्रमाण ६·२८ टक्के आहे. लख-दीवने ज्याप्रमाणे सर्वात जास्त मतदान करून केंद्रप्रदेशातच नव्हे, तर सबंध देशात पहिला क्रम मिळविला त्याचप्रमाणे सर्वांत कमी बाद मतातही त्याचा क्रम पहिला आहे तेथे फक्त ०·७६ टक्के मते बाद झाली. त्रिपुरा २·६९, मणिपूर ३·४७, दाद्रा-नगरहवेली ८·१९ असे इतर केंद्रप्रदेशातील बाद मतांचे प्रमाण आहे. दाद्रा-नगरहवेलीमध्ये ते सर्वात जास्त आहे. तेथील लोकांची ही पहिलीच निवडणूक होती त्यामुळे हे प्रमाण जास्त असणे स्वाभाविक होते.

निरनिराळ्या राज्यातील आदिवासींच्या बाद मतांचा विचार केला तर सर्वात जास्त ७·६० टक्के मते मध्यप्रदेशात बाद झालेली आहेत. त्याखालोखाल ओरिसात हे प्रमाण ७·३९ टक्के आहे. आंध्र ६·१५, बिहार ६·०६, महाराष्ट्र ५·६६, गुजरात ५·४०, आसाम ३·९५, राजस्थान ३·८६, पश्चिम बंगाल ५·२५ असे इतर राज्या-तील प्रमाण आहे. आसाम व राजस्थानातील मतदानाचा एक विशेष म्हणजे तेथे सर्वसाधारण मतदारसंघांपेक्षा आदिवासी मतदारसंघात कमी मते बाद झाली आहेत. आसाममध्ये सर्वसाधारण मतदारसंघात ५·६४ टक्के बाद झाली तर आदिवासी मतदारसंघात ३·९५ टक्के बाद झाली. राजस्थानात हे आकडे अनुक्रमे ४.०१ व ३·९६ आहेत. म्हणजे मतदान कसे करावे याची आदिवासींनाच चांगली माहिती असल्याचे या दोन राज्यात दिसून आले.

आदिवासींच्या एकूण ३७ मतदारसंघांपैकी १४ मतदार संघात मतदान ५० टक्क्यांपेक्षा कमी झाले, त्यात ५ जागा बिहारमधील, ५ ओरिसामधील व ४ मध्य-प्रदेशातील आहेत.

आदिवासींवर काँग्रेसचाच प्रभाव सर्वात जास्त आहे असे गेल्या वेळच्या मतदाना-वरून दिसून आले. अविभक्त काँग्रेसची ही मते असली तरी त्यापैकी बहुसंख्य मतांचा व जागांचा वाटा इंदिराकाँग्रेसलाच मिळण्याचा संभव आहे. ◻ ◻ ◻

# शर्यत जिंकली कंडारेनी पण राजेपद नेले देवकरने !

- प्रल्हाद सावंत

३ वर्षाच्या प्रदीर्घ विश्रातीनंतर मुंबई–पुणे ही १२० मैलाची सायकल स्पर्धा यंदा प्रथमच सुरू झाली. पुण्याच्या रामचरण कंडारे ह्यांनी हे अंतर ६ तास १८ मि. १० सेकंदात तोडून जरी प्रथम क्रमांक मिळविला तरी ५ मैलांचा अवघड घाट पुण्याच्याच भगवान देवकरने २७ मिनीट ९·२ सेकंदात तोडून ' घाटाचा राजा ' हा किताब व द्वितीय क्रमांक मिळविला. तर तृतीय क्रमांक पुण्याच्याच कमलाकर झेंडे यांना मिळाला.

' पुना हेरल्ड 'च्या विशेष प्रयत्नानंतर सुरू होणाऱ्या या स्पर्धेत अनेक जुने चेहरे दिसत होते. पण त्यांची कामगिरी मात्र फोल ठरली. तर अनेक नवोदितांनी अपेक्षेबाहेर कामगिरी केली. ह्या स्पर्धेत मुंबई, नाशिक, नगर, दिल्ली, गुजराथ अशा अनेक ठिकाणच्या स्पर्धकांनी भाग घेतला होता. पुण्यातर्फे चिमण पवार, कृष्णराव कांबळे, जगन्नाथ पिल्ले, रामचरण कंडारे, अँड्यू डीन असे नामवंत सायकलपटू होते. तर मुंबईकरांची भिस्त बापू माल्कम, जे. वरळीकर यांच्यावर होती. म्हैसूरचा व्हीक्टर प्रिंटरही मोठ्या तयारीने आला होता. सुरुवातीच्या ८० स्पर्धकांपैकी ३९ स्पर्धकांनी स्पर्धेपूर्वी हजेरी लावून व्यवस्थापकांना अपशकून तर केला नाही ना ? असे वाटू लागले.

मुंबईच्या ताडदेव-नाक्यापासून सकाळी ७ वाजता मेजर रा. गो. साळवी ह्यांच्या हस्ते ही स्पर्धा सुटली. तेव्हा ३९ स्पर्धक होते.

स्पर्धेच्या सुरुवातीसच म्हैसूरच्या व्हीक्टर प्रिंटरने जोरदार आघाडी मारली. त्याच्या मागोमाग तुकाराम रजपूत, भगवान देवकर, बापू माल्कम अशा निरनिराळ्या बारा खेळाडूंचा गट बऱ्याच अंतरावर होता. ह्या गटाने प्रभादेवी टिळक पुलाजवळ एकेकाळचा विजेता चिमण पवार ह्यास मागे टाकले ते कायमचेच. हा गट जेव्हा ठाणे येथे आला तेव्हा व्हीक्टर व त्यांच्यात ३ मिनटाचे अंतर होते. पण

लवकरच ह्या गटानी मुंब्रा येथे ह्या नवोदित खेळाडूस मागे टाकले ते पुढे न येण्यासाठीच होय.

त्यानंतर हा गट बहुतेक घाटाच्या पायथ्यापर्यंत कायम राहिला. पण घाट चढताना मात्र हा गट पारच विभागला गेला. खोपोलीजवळील शिळे फाटयावर दिलीप खेडकरने जरी प्रथम घाट चढावयास सुरुवात केली, तरी त्याला मात्र घाटाचा राजा बनता आले नाही. येथेच मुंबईकर व पुणेकर ह्यांच्यात चुरस निर्माण झाली व पुणेकरांनी मुंबईकरांचे पानपत केले. पुण्याच्या भगवान देवकरने हे अंतर २७ मिनीटे ९·२ सेकंदात तोडून 'घाटाचा राजा' हा किताब घेतला. त्याला मुंबईच्या बापू माल्कमने गाठण्याचा प्रयत्न केला पण यश आले नाही व त्यास द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले व येथेच मुंबईकरांच्या आशा मावळल्या. ताडदेवच्या नाक्यापाशी उगवलेला सूर्य घाट ओलांडताच अस्ताला गेला. घाट ओलांडताच भगवान देवकरला गाठण्यासाठी रामचरण कंडोरेनी बरेच परिश्रम घेतले. पण त्याला अखेर यश आले ते वाकडेवाडीजवळ होय. तेथून ही जोडी बरोबरीने जाऊ लागली.

स्पर्धेचे अखेरचे टोक जसजसे जवळ येऊ लागले तसतसे दोघांमध्ये विजयासाठी घोडदौड सुरू झाली. पण देवकर कंडारेला पुढे जाऊ देण्यास तयार नव्हता. अखेर कँप विभागातील व्होल्गा हॉटेलजवळ कंडारेनी स्प्रिंट मारून देवकरवर आघाडी मिळविली. ती आघाडी तोडण्याचा देवकरनी प्रयत्न केला. पण दरवर्षीच्या अनुभवा-प्रमाणे रस्त्यामधील प्रेक्षकांच्या तुफान गर्दीमुळे त्याला पराभव पत्करावा लागला. तर तृतीय क्रमांक पुण्याच्याच कमलाकर झेंडे यास मिळाला पण कृष्णराव कांबळे, अँड्यू डीन व आर. सालोमन ह्यांना ४, ५, ६, क्रमांकावरच समाधान मानावे लागले.

प्रथम आलेला रामचरण कंडारे हे २८ वर्षाचे असून हिंदुस्थान अँटीबॉयेटीक्स या कंपनीत नोकरी करतात. ते १९५६ सालापासून सायकल स्पर्धेत भाग घेत आहेत. १९६१ साली त्यांना मुंबई-पुणे शर्यतीत सहावा क्रमांक मिळाला होता. तर मद्रास येथील राष्ट्रीय स्पर्धेकरता त्यांची महाराष्ट्राच्या संघात निवड झाली होती. त्यांना भारत क्लबचे भालेराव आणि कंपनी ह्यांचे सहकार्य मोठ्या प्रमाणावर मिळत असल्याचे त्यांनी मोठ्या आनंदाने सांगितले.

तर दुसरे आलेले भगवान देवकर हे रस्टन कंपनीत टूल फिटर म्हणून काम करीत आहेत. ते रोज ५० ते ६० मैल सायकलचा सराव व आठवड्यात दोन वेळा घाट चढत असत. गतवर्षीपर्यंत महाराष्ट्राचा लांब टप्प्याच्या शर्यतीमधील आधार यंदा प्रथमच ह्या क्षेत्रात पदार्पण करता झाला व अपेक्षेबाहेर त्याने यश संपादन केले. त्याने १९६७ साली मद्रास येथील राष्ट्रीय स्पर्धेत ५००० मी. धावणेत चवथा क्रमांक मिळवला होता.

व्यवस्थापनेच्या दृष्टीने ही स्पर्धा अगदीच अयोग्य होती असे म्हटले तर अति-

शयोक्तीचे होणार नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार मुंबईच्या असोसिएशन सहकार्य केले नाही पण ते न करताही त्यांना अनेक उणीवा दूर करता आल्या असत्या. बाहेरगावच्या स्पर्धकांना उतरण्यासाठी मुंबईत दिलेली जागा अगदीच भिकार होती. तर स्पर्धा सुरू झाल्यावर सायकलस्वाराबरोबर असणारे मोटारसायकलस्वार फक्त पुढील ४ ते ५ क्रमांकाकरताच आणले होते का ते कळत नव्हते. पत्रकारांची व्यवस्थाही योग्य नव्हती. पुण्याच्या पत्रकारांना निदान एक स्टेशनवॅगन तरी मिळाली पण मुंबईकरांना मात्र मिळेल त्या वाहनाने यावे लागले.

रस्त्यामधून म्हणावा तितका प्रचार या स्पर्धेचा झाला नव्हता. संपूर्ण १२० मलात फक्त ४-५ कापडी बोर्ड आढळले. व्यवस्थापनेचा कळस झाला तो शेवटी अंतीम रेषेजवळ होय. अंतीम रेषेच्या जवळील गर्दीमुळे भगवान देवकरला रामचरण कंडारेला मागे टाकता आले नाही. जर त्याला हा रस्ता मोकळा मिळाला असता तर निकाल निश्चित फिरल्याशिवाय राहिला नसता. हे ज्यांनी संपूर्ण स्पर्धा पाहिली ती कोणतीही व्यक्ती सांगेल.

पण 'पूना हेराल्ड' सारख्या छोटया दैनिकाने १०,००० रुपये खर्चून ही स्पर्धा आयोजित केली हे निश्चित भूषणावह आहे. युरोपात अशा अनेक स्पर्धा वर्तमानपत्रे घेतात पण आपल्याकडे हे प्रथमच घडत आहे. त्यामुळे झालेल्या चुका ह्या प्रथमवर्षी तरी क्षम्य मानल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे स्पर्धकांच्या मागे एक ॲम्ब्युलन्स ठेवली असती तर योग्य झाले असते.




त्याचप्रमाणे बक्षीसांची संख्याही फार कमी होती. त्यामानाने नाशिक-मुंबई स्पर्धेकरता अनेक बक्षिसे असतात. ह्याचाही विचार अवश्य व्हावा. पण पुणेकरांनी प्रथम सहा बक्षिसे पटकावून निश्चित पुण्याच्या यशात भर घातली ह्यात शंका नाही.

□ □ □

 पृष्ठ १६ वरून

अक्षरांच्या, नाना नावांच्या कलाकृती होत्या. हवी त्या व्यक्तीची नावं मोठ्या खुबीनं एकात एक खोदली होती. व्यक्तींप्रमाणेच अनेक सोसायट्या, संस्था, बँका, शाळा या सर्वांच्या नावाचे मोनोग्रॅम्स् तयार केले होते त्यानं. मी विचारलं, 'हे सर्व बारीक काम करायला आपण हत्यारं कुठून मिळविली!' त्यावर त्यानं उत्तर दिलं, 'मी ती घरीच तयार केली. वस्तऱ्यापासून!' आश्चर्यानं मी पाहातच राहिलो, इतक्यात एक अंगठी आणून त्यानं मला एक गंमत करून दाखविली, 'हे बघा,' तो म्हणाला 'यावर काय लिहिलं ते वाचा' 'राम' मी म्हणालो, अन् क्षणभराचाही विलंब लागला नसेल, त्यानं आपल्या हाताची थोडी हालचाल केली अन् पुन्हा म्हणाला, 'हे आता वाचा पाहू!' 'सीता' मी म्हणालो, एकाच अंगठीवर ही दोन्ही नावं कोरली होती, पण ती कशी तर ती सीतेच्या बोटात ती अंगठी असेल तर त्यावर 'राम' दिसेल अन् रामाच्या बोटात असेल तर 'सीता' दिसेल!

'सीतारामाचा' हा खेळ त्या कलावंताच्या जीवनातही दिसून येत होता. 'जेथे राघव तेथे सीता' या प्रमाणे त्याची सहचारिणी त्याच्या जीवनाच्या सर्व अंगात जोडीनं साक्ष देत असल्याची खात्री पटत होती. त्याची साक्ष समोरच्या भिंतीवर टांगलेलं एक छायाचित्र देत होतं.

मोठमोठ्या तांबड्या भोपळ्यांच्या ढीगाशेजारी सारा कुटुंब परिवार त्या चित्रात बसलेला होता. मी विचारलं, "हे काय? कशाला बसलात तुम्ही सारे या भोपळ्याभोवती?" "हे सारे भोपळे आमच्या परसातले. त्यांना लावलं, लावून लहानाचं मोठं केलं, खतपाणी घालून वाढवलं या साऱ्यांनी. म्हणून त्यांच्या श्रमदानाचं चीज या छायाचित्राच्या रूपानं आठवण म्हणून कायमच करून टाकलं मी!" त्यानं उत्तर दिलं. "म्हणजे तुम्ही परसात फळबागही फुलविली वाटतं?" मी विचारलं. "हो फळबागच नाही. किंवा एवढ्या एका भोपळ्याचे वेलच तेवढे लावले नाहीत, तर घरातील सांडपाण्यावर वांगी, आलं, आळू, केळी, पपई, दोडकी, भेंडी, गवार, टोमॅटो, पडवळ, मिरची, तोंडली, घेवडा, सोयाबीन, उन्हाळी घेवडा, पावटा, इत्यादी भाजीपाला, फळफळावळ अन् फुलझाडात झेंडू, कण्हेर, चाफा, सूर्यफूल ही झाडंही लावली आहेत. याशिवाय घराच्या कुंपणाशेजारी उभी असलेली ही बोर, हा शेवगा, ही कवठ, ती सीताफळीची, चिंचाची, पेरूची अन् अंजीराची झाडं आम्हाला वरदानंच ठरली आहेत. याच झाडांच्या आश्रयानं आमच्या या वेली उभ्या राहतात, त्या फळाफुलांनी बहरून येतात, त्यामुळं मांडवाची कटकट राहात नाही."

या त्याच्या सांगण्यात अतिशयोक्तीची पुसट छटा असली, तरी त्याच्या, " या झेंडूच्या फुलांनी मंडईत पहिला नंबर पटकाविला होता, अन् सुपाएवढ्या आकाराच्या आळूच्या पानात एका वेळी एका कुटुंबातील सर्वांची इच्छा भागविली होती. तशीच ती अंगणातील शेवग्याची शेंगही मोठी चवदार ! तिच्यासाठी खास कोल्हापूरचा माणूस आला. त्यानं शेवग्याची भाजी खाल्ली अन् लावण्यासाठी डहाळी मागून घेऊन गेला. पपई खास वॉशिंग्टन अन् सिलोनी बियांची असल्यामुळे बाजारात तिची विक्री पाहता पाहता होते. घरी आलेल्या पाहुण्यांसाठी ब्रुक बाँड किंवा लिप्टनच्या चहाची गरजच पडत नाही. चहाच द्यायचा तर तो गवतीचहा अन् फराळासाठी पेरु, पपई, गावठी चवदार केळी अन् अशीच इतर फळं देण्यात येतात." हे त्याचं निवेदन ऐकून मी चकितच झालो !

" ही कसली झाडं ?" माझ्या प्रश्नाचं उत्तर देताना त्यानं मोठी मौलिक माहिती दिली, " हे झाड करंजीचं, याचं तेल दिव्यासाठी आम्ही उपयोगात आणतो. तसा त्याचा उपयोग लाकडांना लावण्यासाठीही करतो, त्यामुळे लाकडांना किडा लागत नाही. अन् त्या कडूलिंबामुळं हवा शुद्ध राहते, तसा त्यावरचा गुळवेलही औषधीसाठी खूप उपयुक्त ठरतो. ती कण्हेर, बाभूळ, उंबर याही झाडांचा या ना त्या प्रकारे उपयोग करून घेतोच आम्ही !"

ही सारी झाडं काही त्यानंच लावलेली नव्हती. ती तशी पूर्वीपासूनच वाढलेली होती. पण या जागेत राहायला आल्यावर त्यानं त्यातील एकही झाड तोडलं नाही तर त्याचा उपयोग स्वतःच्या जीवनात करून घेतला, झाडच काय पण माती गोटयांचाही उपयोग त्यानं घर बांधण्यासाठी केला. त्यानं घराचा पाया खोदला तो गणेशचतुर्थीला स्वतःच, अन बांधून पूर्ण केलं ते गणेशचतुर्थीला स्वतःच. पायात त्याला एक गणेशमूर्ती सापडली म्हणून त्यानं घराचं नाव ठेवलं ' मंगल कृपा ! '

त्याच मंगळमूर्तीची पूजा तो स्वतः फुलविलेल्या बागेतील फुलांनी करतो. त्याला नैवेद्य दाखवितो तोही स्वतःच लावलेल्या झाडावेलींच्या फळांचा अन् समोर बसून भक्तीभावाने भजन करतो तेही स्वतःच रचलेल्या अन् संगीतबद्ध केलेल्या


# व्होल्गा जेव्हा लाल होते

## ले. : वि. स. वाळिंबे

**मूल्य : अठरा रुपये**

**राजहंस प्रकाशन**



सदाशिव दत्तात्रेय महामुनी

भजनाच्या ओळींनी पेटीच्या सुरेल आवाजाच्या साथीसह गोड गळयावर भैरवीत ' अनाथाचा नाथ अमुचा पंढरीनाथ '...

पेशानं शिक्षक पण मनानं कलाकार असलेल्या या नाना रंगी, नाना ढंगी व्यक्तिमत्त्वानं आता चाळीशी ओलांडली आहे खरी, पण अजून उत्साह तोच कायम आहे. कुठेही काहीही असो, स्वारी तयार! मग दत्तात्रेयाच्या उत्सवासाठी कुणी नृसिंह सरस्वतीचं चित्र मागितलं असेल, तर ते रात्रभर बसून तयार करून देईल. कुणाला काळीश्वरी देवीची मूर्ती हवी असेल तर उण्यापुऱ्या एक महिन्यात तो ती हातावेगळी करील; कुणाचं एन्लार्जमेंटचं काम रात्रंदिवस खपून करून देईल तर कुठं प्रचार मोहिमेवर जायचं असलं तरीही तिथं स्वतःच रचलेली गाणी गाऊन प्रचार कार्याला हातभार लावील अन् ' डोळं उघड, दादा डोळं उघड...' किंवा ' घात आली पेरणीची अगबाई, कशी मी जायाची...!' या ग्रामीण गीतांनी श्रोत्यांची मनं अक्षरशः जिंकून घेईल.

नुकत्याच पार पडलेल्या जांबोरीसाठी स्काऊट शिक्षक या नात्यानं त्यानं बालवीर चळवळीची कामं केली. मुलात उत्साह निर्माण केला अन् आपणही त्यात रममाण झाला! त्याला कुठलंही व्यसन नाही, कुठलीही चैन नाही, कशाची चिंताही नाही अन् मनाची व्यग्रताही नाही. सदा काम, अन कामातच आराम हेच त्याचं ध्येय. या ध्येयातूनच त्यानं आपल्या जीवनात छंदाची नानाढंगी, नानारंगी बाग फुलविली आहे. स्वतःचं असं एक वेगळंच जग निर्माण केलं आहे, अन् तो त्या नानारंगी, नाना तरंगी जगात स्वतःला विसरून गेला आहे! अशा या सदैव उत्साही, अन् आनंदी, असलेल्या या हौशी कलाकारचं नाव आहे, सदाशिव दत्तात्रय महामुनी.

□ □ □

# आगामी निवडणूक : अंदाज

## पं. वि. म. जोशी

या पद्धतीप्रमाणे सर्व अक्षरांचे तीन गट पाडले आहेत.

१. बुध-गुरुचा गट त्याची अक्षरे :– क, प, द, ध, (च), फ, क्ष, ज्ञ, भ, घ, थ, छ. हा गट सध्या पराभूत (devalued) झालेला आहे.

२. रवी-चंद्र-शनीचा गट :– या गटाची अक्षरे ज, स, ख, हृ, ड, ग, श, म, ट, आणि ठ. हा गट सध्या दुय्यम जोरदार (Second best) आहे.

३. शुक्र-मंगळाचा गट :– या गटाची अक्षरे च, ल, र, त, न, य, व, ब आणि सर्व स्वर. हा गट सध्या सर्व जगभर अत्यंत प्रबळ झाला आहे. या गटात 'इ' हा स्वर आहे. याला आपण 'इंडिकेट' नाव देऊ या. त्याचप्रमाणे दुय्यम गटात 'स' अक्षर आहे त्याला आपण सिंडिकेट म्हणू या.

सार्वजनिक कामात नाव आणि आडनाव विचारात घ्यावे. कोणचा गट मोठ्या कालाकरता (२॥ वर्षे) प्रबळ झाला आहे, हे शनी (गोचरी) ग्रहावरून ठरवावयाचे. छोटा काळ (१॥ वर्षे) गोचरी राहूवरून, वर्ष गोचरी गुरुवरून, महिना गोचरी रवीवरून व दिवस चंद्रावरून. शनी मेषेत मंगळाच्या राशीत आहे, राहू कुंभेत शनीच्या राशीत आहे. गुरु वृश्चिकेत मंगळाच्या राशीत आहे, रवी कुंभेत शनीच्या राशीत आहे व ता. १ ते ४ चंद्र मेष व वृषभ राशीत आहे. मंगळ-शुक्राच्या राशीत आहे. याप्रमाणे पाहिले तर पाचापैकी तीन राशी शुक्र-मंगळाच्या आहेत व दोन शनी-रवी-चंद्र गटाच्या आहेत.

मोठ्या कालाला ५ गुण, छोट्या कालाला ४ गुण, वर्षाला ३ गुण, महिन्याला २ गुण व दिवसाला १ गुण असे द्यावयाचे व त्यांच्या येणाऱ्या बेरजेवरून निकाल द्यावयाचा. ज्याला ज्यास्त मार्क पडतील तो पक्ष अगर ती व्यक्ती खास निवडून येते. याच पद्धतीने आम्ही प्रेसिडेंट जॉन्सनच्या निवडणुकीचा अंदाज बरेच दिवस आधी दिला होता. त्याचप्रमाणे पुण्यातील प्रेसिडेंट कार्ले गुरूजी यांच्या निवडणुकीचाही दिला होता.

आता वरील पद्धतीने जे पक्षोपपक्ष आहेत त्यात कोणत्या पक्षाला ज्यास्त शक्यता आहे ते पाहू या. एकूण आज पुढे आलेले पक्ष. इंडिकेट, सिंडिकेट, संसोपा, जनसंघ, प्रसोपा व कम्युनिस्ट. या पक्षांना कसे मार्क पडतात ते पाहू या.

मागील निवडणुकीत बुध-गुरु गट फार प्रबल होता. नुसत्या महाराष्ट्रात देशमुख, देसाई, पाटील या आडनावांची जवळ जवळ ऐंशी माणसे निवडून आली होती. या गटाला निवडून येण्याचा चान्स फार कमी आहे. वैयक्तिक व्यक्तीचे ग्रह चांगले असतील तरच शक्यता आहे. प्रथम जाहीर झालेली ता. २६ सिंडिकेटला चागली होती. आताची बदललेली तारीख इंडिकेटला चांगली आहे.

आता सर्व गटांच्या गुणांचा तक्ता काय दाखवितो ते पाहू या.

| पक्ष | मो. का. | छो. का. | व. | म. | दि | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| इंडिकेट | ५ | ० | ३ | ० | १ | ९ |
| सिंडिकेट<br>सं. सो. पा.<br>जनसंघ | ० | ४ | ० | २ | ० | ६ |
| प्र. स. प.<br>कम्युनिस्ट | ० | ० | ० | ० | ० | ० |

यावरून असे दिसते ३–२ या प्रमाणात इंडिकेट-सिंडिकेटचे उमेदवार निवडून येतील व इंडिकेटचे दुसऱ्या कोणत्याही पक्षापेक्षा पूर्ण मताधिक्य होईल.

आता वरील पक्षातील काही प्रमुख व्यक्तींची नावे घेऊन काय होते ते पाहू. या.

| | एकूण |
|---|---|
| इंडिकेट – इंदिरा गांधी नावाप्रमाणे ९ व आडनावाप्रमाणे ६ – | १५ |
| सिंडिकेट – मुरारजी देसाई नावाप्रमाणे ६ व आडनावाप्रमाणे ० – | ६ |
| जनसंघ – अटल वाजपेयी नावाप्रमाणे ९ व आडनावाप्रमाणे ९ – | १८ |
| प्र. सो. पा. – नारायण गोरे नावाप्रमाणे ९ व आडनावाप्रमाणे ६ – | १५ |
| इंडिकेट – यशवंतराव चव्हाण नावाप्रमाणे ९ व आडनावाप्रमाणे | |

'च' हे अक्षर इंडिकेट गटातही आहे व शिवाय डीव्हॅल्यूड गटातही आहे. त्यामुळे निश्चित असे काही सांगता येणार नाही. वैयक्तिक कुंडलीवर अवलंबून राहील.

अशारीतीने पाहिले तर बुध-गुरु गटाचे एक नाव असलेल्यांनासुद्धा निवडून येण्याचा चान्स कमी आहे. तरी उमेदवार निवडताना शक्य तो यशदायी गटातील नाव व आडनाव असलेला उमेदवार निवडावा. त्याचप्रमाणे जन्मकुंडलीत ज्यांचे रवी-गुरु मिथुन-कन्या-धनु अगर मीन राशीत असतील त्यांना निवडून येण्याचा चान्स कमी राहील.

ज्यांना उभे राहावयाचे असेल त्यांना मार्गदर्शन केले जाईल. यश येण्याला काही अडचण असेल तर त्यावर अतींद्रिय उपाय केला जाईल. जन्म तारीख व नाव कळविल्यास निवडणुकीबद्दल निश्चित कळविले जाईल.

□ □ □

## गुजराथचे वार्तापत्र:...

पृष्ठ ६ वरून

राजकारण चालते. त्यातल्या त्यात जे. सी. म्हणजे तरुणांच्या जास्त जवळ. पण या जे. सी. त काय तारे तोडले जातात याचा एक मासला सांगतो.

मध्य-पूर्व निवडणूक आवश्यक आहे काय? हा विषय गेल्या सोमवारी अहमदाबादेच्या जे. सी. त परिसंवादासाठी ठेवला गेला.

पहिला वक्ता विठ्ठलभाई अमीन हा व्यापारी. ही निवडणूक म्हणजे आमच्या व्यापाऱ्यांवर नसता खर्च आहे असे त्यांचे प्रांजल मत. 'निवडणुकांची बिले शेवटी आम्हासच भागवावी लागतात.' हा त्यांचा कबुलीजबाब कोणालाही आवडेल. पण नंतर त्यांनी उगीचच इंदिरा गांधींवर वैयक्तिक टीका करून रसभंग केला. वासुदेव मेहता हे गुजराथचे नावाजलेले पत्रकार. राजकीय दृष्ट्या ही उत्तम गोष्ट आहे असे सांगून ते म्हणाले, सर्व राष्ट्रीय समस्यांच्या बाबतीत असा हा जनतेचा कौल मागण्यात यावा! मेहताजी, तरुणांना एवढे का कळत नाही की हा निवडणूक–जनतेचा कौल फक्त नामके वास्ते आहे. ह्यात तसा अर्थ नाही.

ईश्वर पेटलीकर हे दुसरे ख्यातनाम पत्रकार. इंदिरा गांधी बहुमताने जरी निवडून आल्या तरी खरे समाजवादी धोरण अंमलात आणणे त्यांना अशक्य आहे असे त्यांनी सांगितले.

सारी भाषणे एका ठरीव साच्याची.

म्हणा ही म्हातारी मंडळी तरफदारी तरी कोणच्या तोंडाने करतील त्यांच्या पुढाऱ्यांची? त्यांची कारस्थाने तरुणांना कळत नाहीत? मग हा तोंडपुजेपणा कशासाठी? त्यांच्या पातळीवर त्यांची खुर्ची टिकविण्यासाठी–

म्हणून तरुण कंटाळून अशा राजकीय परिसंवादांसाठी आताशा जातच नाहीत.

सर्वच राजकारण.

बडोद्याचे महाराज (साहेबाच्या इंग्रजीत युवराज!) फत्तेसिंग गायकवाड हे मध्यंतरी इंग्लंडला गेले होते. इंडिकेट–सिंडिकेट ही फाळणी पक्की झाल्यावर त्यांना आपला कार्यक्रम रद्द करून भारतात विमानाने तातडीने यावे लागले. ते आले ते इंडिकेटचा माणूस म्हणून. त्यांनी इंदिरा गांधींच्या पहिल्या महत्वपूर्ण बैठकीत आपली हजेरी लावली होती. पण आठच दिवसात हा पक्षी इंदिरेच्या पिंजऱ्यातुन पळाला व सिंडिकेटच्या पिंजऱ्यात पहिल्याप्रमाणे नांदू लागला.

हे कसे घडले?

बकरीचा कुत्रा, कुत्र्याची बकरी बनविणे, हे जादुगारास साध्य असते. पण इंडिकेटचा गडी सिंडिकेटचा चाकर बनविणारा जादूगार कोण?

हा जादुगार मोरारजी देसाई.

मातोश्री शांतादेवी, मायबाप बडोद्याचा मतदारसंघ व स्वतः 'गुजराथनो सर्वोच्च' या त्रिघांचे असे संयुक्त 'प्रेशर' आणण्यात आले की अहिल्या शिळा बनली !

वा: रे मोरारजी, गुजराथची प्रजा या तुमच्या 'रोष ट्रिक'वर बेहद्द खूष आहे. कारण फत्तेसिंग महाराज जर त्या वेळी संपूर्णतया 'डीफेक्ट' झाले असते तर इंडिकेट एव्हाने गुजराथेत सत्ताधीश झाली असती.

फत्तेसिंगांवर जो गुर्जर जनतेचा थोडा लोभ आज दिसतो तो या त्यांच्या त्या पुनर्पक्षांतरासाठी आहे आणि स्वतंत्र पक्षावर गुर्जर पांढऱ्या टोप्यांचा रोष आजही आढळतो तो त्यांच्या त्या वेळच्या गद्दारीबद्दल. त्या वेळी स्वतंत्र पक्षाचे अध्वर्यू भाईलालभाई पटेल यांनी मला सांगितलेले आठवते, 'आता काय, फक्त थोडयाशा काळाचा प्रश्न आहे. बहुश्रा पुढील महिन्यात आम्ही सत्तेवर येऊच.'

बिचारे भाईकाका स्वर्गस्थ झाले !

गुजराथचे मुख्यमंत्री व्हायचे त्यांचे स्वप्न काळाने धुळीस मिळविले.

पी. एस. पी. स्वतंत्र पक्ष व इंडिकेट यांना मदत करणार होती. त्यामुळे पी. एस. पी. वरही जनता (?) क्रुद्ध झाली होतीच. मात्र पी. एस. पी. चे मरण घडण्यासाठी १॥–२ वर्षांचा कालावधी जावा लागला. इंडिकेटने आज पी. एस. पी. या अर्धमेल्या पक्षास संपूर्ण साफ करून टाकले आहे आणि आता नाथ पै या स्कॉलर-स्टेट्स्मननंतर पी. एस. पी. तर जवळजवळ अनाथ झाल्यासारखीच आहे.

कोणचाही पुढारी म्हटला की लोकांना खूष करण्याचे त्याचे तंत्र ठरलेले असते. मध्यंतरी तारकेश्वरी सिंहा पुण्यास आल्या त्या वेळची गोष्ट. जाहीर भाषणाच्या अर्ध्या तास आधी त्यांनी एका लहानशा कागदाच्या कपटयावर मराठी पुढाऱ्यांची यादी उतरवून घेतली. भाषणात त्या यादीच्या सहाय्याने त्यांनी पुणेकरांना हा हा म्हणता खूष करून सोडले. एकदा पेशंटला भूल दिली की कुशल सर्जनला शस्त्रक्रिया करावयास किती वेळ लागतो ?

बडोद्यास महिलामंडळामार्फत तारकेश्वरींचे भाषण ठेवण्यात आले होते. तारकेश्वरींनी तर महिलामंडळाच्या कोणच्याच स्त्रीस पूर्वी कधीच पाहिले नव्हते. भाषणापूर्वी पाच मिनिटे आधी जी जानपहचान झाली असेल ती. पण तिच्या जोरावर बाईंनी स्थानिक राजकीय पुढाऱ्यांचे जुने किस्से सांगून स्थानिक लोकांना असे खुष करून सोडले की पुसायची सोय नाही.

तारकेश्वरी जेथे ही प्रादेशिक स्ट्रॅटेजी यशस्वीपणे पार पाडू शकतात तेथे त्यांचे गुरुवर्य मोरारजी का मागे पडणार होते–आणि तेही गुजराथेत ?

लोकांचा मुड कळणे अवघड असते.

बडोद्यात दोन मैदाने आहेत. एक आहे पोलो मैदान. ते एस. पी. कॉलेज

ग्राऊंडप्रमाणे. दुसरे ज्युबिली बाग मैदान. ते तळ्यातल्या गणपतीच्या बागेतल्या खुल्या जागेएवढे.

स्थानिक लोकांना तीन भयस्थाने वाटत होती :

१. इंदिराबाई नुकत्याच गुजराथेत येऊन गेल्या आहेत. नाही म्हटले तरी लोकांच्या मनावर थोडाफार परिणाम होतोच अशा लोकाग्रणी पुढाऱ्यांचा.

२. चोखावालांच्या सुरतेच्या स्वागत समारंभात दंगल घडविण्यात आली. तिचा 'बदला' या इंडिकेटच्या लोकांनी घेतला तर आले का वांधे ? आपल्या हातांनी आपले नाक कापून घेतल्यासारखे व्हायचे !

३. दंगल होणार या भीतीने गर्दी जमली नाही तर आपले हसू होईल. आणि मोरारजीभाई कडक शब्दात आपली चंपी करतील ते वेगळे.

म्हणून पुष्कळ विचारांती बडोद्याच्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी मोरारजीभाईंची सभा ज्युबिली बागेच्या ट्रीचभर पण बंदिस्त (व म्हणून सुरक्षित) जागेत घेतली. मात्र मोरारजींच्या भाषणास तोबा गर्दी झाली.

सुरुवातीस आरडाआरडा झालाच.

'ओय् मोऱ्या, पाछळ जाव,' 'मोरारजीभाई मुर्दाबाद' 'सिंडिकेट मुर्दाबाद,' 'ग्रांड अलायन्स, नो ग्रांड फेल्युअर' वगैरे आरोळ्या.

मोरारजीभाईंनी ओरडणाऱ्या पोरांवर चक्क दादागिरी केली.

'मला चूप बसा सांगणारे तुम्ही कोण ? माझी गुजराथच्या प्रजेची ४० वर्षांची सेवा झाली आहे. गुजराथच्या प्रजेस मला काय वाटते ते सांगण्याचा मला अधिकार आहे. मी बोलणार. कारण गुर्जर जनता माझी आहे. ज्यांना ऐकावयाचे नसेल त्यांनी येथून निघून जावे. त्यांच्या मागे त्यांनी माझे ऐकावे म्हणून मी नाही जाणार. लक्षात ठेवा, मी मतांची भीक मागायला आलो नाही येथे. मी आलो आहे गुजराथच्या प्रजेस सावध व्हा एवढे सांगण्यासाठी. ते सांगण्याचा वडीलकीचा हक्क माझा आहे. तो मी बजावणारच. ज्यांना ऐकावयाचे नसेल त्यांनी खुशाल निघून जावे. बाकीचे लोक माझे भाषण ऐकण्यासाठी जमले आहेत. त्यांना त्यांच्या पुढाऱ्यास ऐकण्याची घाई झाली आहे हे मला माहीत आहे. त्यांच्यापैकी एकजण वर दिल्लीस श्रेष्ठ नेता म्हणून गेला तर हित त्यांचेच आहे हे न ओळखण्याइतकी गुजराथची जनता वेडी खास नाही !'

मोरारजी दोन तास ठणठणीतपणे भाषण करीत होते.

मला आश्चर्य वाटले, की प्रादेशिक आवाहनाचे एवढे सामर्थ्य असू शकते !

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्धकेले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Biweekly). : 40 Paise : Regd. No. M-H 649

# अग्निपुत्र

वसंत पोतदार

मूल्य : रुपये चौदा

प्रसिद्ध झाले.

पूर्वग्राहकांनी आपल्या प्रती
कार्यालयातून नेण्याची
व्यवस्था करावी.
दुपारी २॥ ते ६

परगावच्या पूर्वग्राहकांच्या प्रती
रवाना करण्यास
सुरुवात झाली आहे.

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.